# तर अजितनाथ रे यांना सरन्यायाधीशपद एक दिवसाकरिताही लाभू शकत नव्हते....

माणूस
शनिवार । १२ मे १९७३
पन्नास पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

१२ मे १९७३

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा — अंक : एकोणपन्नास

## सप्रेम नमस्कार

२८ एप्रिल, ७३

◘ २८ एप्रिल अंकातील आधुनिक विवेकानंदावरील श्री. निळू दामले यांचा लेख वाचून फार समाधान वाटले. ' विश्व हिंदू परिषद संमेलन '—परिषदेमध्ये श्री. दत्ता बाळ यांच्या व्याख्यानातील उताऱ्याने खरोखर सिद्ध होते, की त्यांच्या व्याख्यानातील एक शब्दही कळत नाही. मी त्यांची दोन-तीन व्याख्याने ऐकली व एकदा प्रत्यक्ष भेटही घेतली. आतापर्यंत असे वाटत होते की आपण अज्ञानी आहोत. आपली बुद्धिमत्ता त्या थोर महात्म्याचे व्याख्यान ऐकून ते समजण्याइतकी परिपक्व झाली नाही; पण आपल्या या लेखाने आमच्यासारखे इतरही अनेक सूज्ञ आहेत की ज्यांना श्री. दत्ता बाळ यांचे म्हणणे कळत नाही. स्पष्टपणे सांगून अज्ञान का प्रकट करा! आपण श्री. निळू दामले यांच्या स्पष्टोक्तीबद्दल त्यांना खूप खूप धन्यवाद द्यावेत ही विनंती.

के. जो. कुलकर्णी, मुंबई

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# विश्व हिंदू परिषदेचे
# ( संमेलनाचे ! )
# विकृत दृष्टीने केलेले समालोचन

अ. वि. कुलकर्णी

'माणूस'च्या २८ एप्रिल १९७३ च्या अंकात श्री. निळू दामले यांचा विश्व हिंदू परिषदेचे अलीकडेच मुंबईत जे मुंबई विभागाचे संमेलन झाले त्याविषयीचा वृत्तांत आणि श्री. दामले यांची त्यावरील टीकाटिप्पणी असणारा लेख 'कव्हर स्टोरी' म्हणून आपण छापला आहे. हा लेख श्री. दामले यांनी खोटेपणाने, बेजबाबदारीने आणि तर्कविसंगत पातळीवरून लिहिला आहे असे मी म्हणतो. कारण वार्ताहर म्हणून या परिषदेला अथपासून इतीपर्यंत मी उपस्थित होतो. वार्ताहर कक्षेमध्ये बसून मी परिषदेचे कामकाज पाहिले आणि ऐकले. श्री. दामले यांनी परिषदेच्या मांडवात कोठे बसावे हा त्यांचा प्रश्न आहे. कारण वार्ताहर कक्षेमध्ये मी त्यांना एकदाही पाहिले नाही. परिषदेचे अ. भा. सरकार्यवाह श्री. दादासाहेब आपटे आणि मुंबई विभागाचे मंत्री श्री. अनंतराव कुलकर्णी वारंवार वार्ताहरांना भेटून त्यांना परिषदेविषयी माहिती देत होते आणि त्यांच्या शंकांचे निरसन करीत होते. श्री. दामले यांना या सुविधांचा लाभ घ्यावासा वाटला नाही हे परिषदेचे दुर्दैव होय. अन्यथा परिषदेचा उद्देश, ध्येय आणि कार्यक्रम याविषयीची माहिती त्यांना मिळाली असती आणि प्रस्तुतच्या लेखात त्यांनी ज्या शंका प्रदर्शित केल्या आहेत त्याचे निरसन होऊ शकले असते असे मला वाटते.

श्री. दामले यांचा बेजबाबदारपणा आणि खोटेपणा दाखविण्यापूर्वी त्यांनी उपस्थित केलेल्या आणि आपण मुखपृष्ठावर जो मथळा दिला आहे त्याविषयी माझेही दुमत नाही हे प्रामाणिकपणे मला कबूल केलेच पाहिजे. श्री. दत्ता बाळ यांची ओळख 'महाराष्ट्राचे विवेकानंद' म्हणून एका भाषणकर्तीने करून दिली या विषयी श्री. दामले यांना आणि आपण मुखपृष्ठावर तसा मथळा दिल्यामुळे आपल्याला राग आला आहे, हे मी समजू शकतो. विवेकानंदांसारख्या विभूतीशी स्वतःची तुलना कोणी करू नये वा दुसऱ्या कोणाला करवू देऊ नये हे खरेच आहे आणि

पृष्ठ ४१ वर

# लेके रहेंगे हमे क्या लेनदेन है अलग विदर्भसे ?

निळू दामले

## मुक्काम : नागपूर

१ मे. कामगार दिन. महाराष्ट्र दिन; ह्या वर्षी दुष्काळ दिन.

१८ एप्रील रोजी नागपूर शहरात झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर १ मेला धोटे यांनी नागपूर बंदची हाक दिली होती. पोलीस बंदोबस्त जबरदस्त होता. शहरात एक प्रकारचे दहशतीचे वातावरण पसरलेले होते.

आदल्या दिवशी चिटणीस पार्कमधे झालेल्या सभेत बंद यशस्वी करूच असा निर्धार अनेकांनी व्यक्त केला होता. "उद्या काय होणार" अशी चिंता सर्वसामान्य दुकानदाराला लागून राहिली होती.

भरवशाच्या म्हशीला टोणगा झाला. कुठेही जाळपोळ नाही, लुटालूट नाही. सर्व कसे शांतपणे पार पडले. विडी-काडी, चहा, न्हावी ह्या सोयी उपलब्ध होत्या. चहाच्या दुकानातून लुटून लुटून काय लुटणार? कळकट, पोचे आलेली ॲल्युमिनियमची भांडी? की चहाच्या मोडक्या तोडक्या गाळण्या? तीच गत न्हाव्याच्या दुकानाची. वस्तरे पळवून काय करणार? (जांबुवंतरावां-सह त्यांचे बरेच साथीदार दाढीवाले! केस वाढवणारे!) त्यामुळे ही दुकाने बिनधास्त उघडी होती. बाकी सर्व दुकाने बंद होती. बऱ्याच जणांनी आधीच आपल्या दुकानातला मालही इतरत्र हलवून ठेवला होता.

दुपारी ३ वाजता शहीद चौकातून मिरवणूक निघाली. शहीद चौकातच विदर्भ चंडिकेची स्थापना करण्यात आलेली आहे. आसपासच्या बंद दुकानांच्या पायरीवर रमीचे अड्डे चालले होते. पैशाचे खुर्दे खुळखुळत होते. (बंद असला म्हणून काय झाले? करमणूक नको? मनोधैर्य टिकवणे अत्यावश्यक आहे!) दीड-दोनशे माणसे आसपास बसली होती. दोनचा सुमार होता. असलेल्या लोकात एकही माणूस असा नव्हता की त्याच्याशी बोलता येईल. सगळे राकट, बिना कामधंद्याचे आणि 'इतर' धंद्यातलेच लोक दिसत होते. (शिवसेनेच्या काही पाठीराख्यांसार-खेच!) वेगळा विदर्भ कशासाठी, आर्थिक कारणे कोणती असे प्रश्न विचारणे निरर्थक होते. बापूजी अणे

पासून धोटेंपर्यंत सर्वांनी वेगळा विदर्भ मागितला आहे. म्हणून 'अलग विदर्भ लेके रहेंगे' येव्हढेच त्यांना समजत होते.

मोर्चा गावात फिरला. सत्याग्रह झाला. अटक झाली. पण काही गडबड न होता.

पोलिसांनी आणि जनतेने निश्वास टाकला. पण केवळ एका दिवसापुरताच ! ज्या कारणासाठी ही विदर्भ-बंदची हाक देण्यात आली होती ती कारणे तशीच शिल्लक राहणार आहेत. महाराष्ट्रातले ते एक अवघड दुखणे आहे. अनेक थोरामोठयांनी हे विदर्भाचे घोंगडे भिजत ठेवायला हातभार लावला आहे.

ह्यावेळचा नागपूर बंद, त्या आधीचे लूटमारीचे प्रकार 'यशस्वी' होण्याला अनेक शक्ती कारणीभूत आहेत.

प्रमुख कारण होते अन्नधान्य समस्या सोडवण्यात 'तुडवडामंत्री' भाऊसाहेब वर्तक यांना आलेले अपयश. रेशनच्या दुकानावरच्या लांबलचक रांगा; त्यातूनही अपुरे मिळणारे धान्य, बाहेर काळ्याबाजारात चढलेल्या 'काळ्या' धान्याच्या किमती व ह्या सर्वाचा परिणाम म्हणून चिडलेला सामान्य नागरिक हे सामान्यतः सर्व ठिकाणी आढळून येणारे चित्र नागपूरातही होतेच. त्या चिडीमुळे हा कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न बनल्याने 'बंदूकमंत्री' शरद पवारांचे शिपाईगडी मावळे इतर ठिकाणांप्रमाणेच गोळ्या मोजत नागपूरातही हजर आहेतच. 'आश्वासन मंत्री' वसंतराव नाईक यांचे राज्यशकट चालवण्यातले अपयश सामान्य माणसाला त्रस्त करून सोडत आहे. ती जाणीव 'बंद' चे कार्यक्रम घडवून आणायला मोठ्या प्रमाणावर जबाबदार होती. प्रवासाला बाहेर पडले तर हे त्रस्त भकास चेहेरे महाराष्ट्रातल्या कुठल्याही एस्. टी. त पहायला मिळतात.

अन्नधान्याच्या तुटवड्याएव्हढाच विणकरांचा जटिल आणि जुना प्रश्नही आर्थिक बिकट परिस्थितीत पृष्ठभागावर आला होता. विणकरांची गणती नागपुरात लाखांमधे करावी लागेल. सरकारच्या एक ना धड भाराभर चिंध्या करून ठेवणाऱ्या नियोजनामुळे आणि आंधळ्या अंमलबजावणीमुळे ह्या लाखो विणकरांची अवस्था दिवसेंदिवस फार बिकट होत चालली आहे.

विणकरांना लागणारा सुताचा पुरवठा आणि निर्माण झालेल्या साड्यांना बाजार मिळणे गेले काही वर्षे उत्तरोत्तर कठीण होत चालले आहे. हातमागावर काम करणाऱ्या ह्या विणकरांना जेमतेम ३ रुपये रोजावर आपल्या पोटाची खळगी भरण्याची पाळी येत आहे. अनेक वर्षे चळवळी करूनही हातमाग विणकरांच्या जीवनाची, धंद्याची पाहणी सरकारने केलेली नाही.

ह्या विणकरांचा प्रश्नच गेले काही दिवस ज्वलंत बनला आहे, ज्याचा फायदा जांबुवंतराव धोटे सतत घेत राहतात, आजही घेतला गेला आहे.

लोकांची अन्नधान्याची चिंता आणि विणकरांचा प्रश्न ह्या दोन ज्वलंत

प्रश्नांचे भांडवल करून त्याला स्वतंत्र विदर्भाची मागणी जोडण्याची चलाखी जांबूवंतराव करत आले आहेत. आंदोलन होते रोटीसाठी आणि विदर्भासाठी झाले असे धोटे सांगतात.

अन्नधान्य पुरवठ्याबाबत व दुष्काळाबाबत सरकारचे अपयश आता लपलेले नाही. दुर्बल लोकमताचा फायदा घेऊन अपयश लपवण्यात वसंतराव यशस्वी होतीलही. परंतु १ मेच्या विदर्भ बंद कार्यक्रमाच्या निमित्ताने वेगळा विदर्भ ही मागणी आणि त्यासाठी उभारल्या जाणाऱ्या चळवळीचे अंत:प्रवाह जाणून घेणे आवश्यक आहे. कारण हे अंत:-प्रवाह राजकारणातले डावपेच, चळवळीचे खायचे दात, नेत्यांचे अज्ञान व स्वार्थसाधूपणा अशा अनेक गोष्टींवर प्रकाश टाकतात.

जांबुवंतराव व त्यांचा फॉरवर्ड ब्लॉक आज वेगळे विदर्भाचे आंदोलन चालवत आहे. ज्यांच्या जिवावर हे आंदोलन चालवले जाते त्या विणकरांचे ह्याबाबत काय म्हणणे आहे? अनेक विणकरांशी ह्याबाबत मी चर्चा केली. सर्वांचा सूर एकच दिसला. 'जांबुवंतरावांसकट सर्वच नेत्यांनी आमच्या प्रश्नांचा कधी अभ्यास केला नाही, ते प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न केले नाहीत. आम्ही गरीब राहण्यातच त्यांचे भले आहे. म्हणून ते आम्हाला वर येऊ देत नाहीत. आमचा उपयोग स्वत:च्या आंदोलनात करून घेतात—असा सूर. विणकर सेनेचे एक नेते म्हणाले, 'स्वतंत्र विदर्भ कशासाठी ह्याची आम्हाला कल्पना नाही. आम्हाला तसे समजावून कधीच देण्यात आलेले नाही. पण धोटे नेहमी आमचा प्रश्न स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला जोडतात त्यामुळे आम्हाला काहीच बोलता येत नाही.'

काही व्यापाऱ्यांशी बोललो. 'हमे क्या लेना देना है अलग विदर्भसे? ये लोग हमे लूटेंगे. इस डरसे हमे दूकान बंद रखना पडता है. इनके पार्टीको चंदा देना पडता है.'

काही डॉक्टर्स, वकील अशा मंडळींचा कानोसा घेतला. वेगळा विदर्भ त्यांना मान्य आहे का असे विचारले. बऱ्याच जणांना वेगळे राज्य करून काही फायदा होणार नाही असे वाटत होते. काही जणांनी मागणीला पाठिंबा दर्शवला पण त्याची कारणे कोणती म्हणून विचारले तेव्हा कोणतीही आर्थिक कारणमीमांसा त्यांना देता आली नाही. महाराष्ट्रात आम्हाला सापत्नभावाने वागवले जाते, आमच्याबद्दल महाराष्ट्रीय माणूस द्वेष बाळगतो म्हणूनच आम्हाला वेगळे व्हायचे आहे अशी तक्रार त्यांनी केली. परंतु ही कारणे भावनात्मक आहेत म्हणूनच दुर्बल आहेत हे त्यांनी मान्य मात्र केले.

नागपूर नगरपालिकेच्या उपाध्यक्षांना विचारले त्यांचे काय मत आहे म्हणून. हे जनसंघाचे सदस्य वेगळ्या विदर्भाचे समर्थक. 'अलग विदर्भ होके रहेगा' असे व्यासपीठावरल्या भाषणासारखे सारखे सांगत होते. 'हमारे पास अनाज है, कपास है, बस वह काफी है, गभा नहो होगा तो

क्या हुआ ?' नारा लगाएंगे. महाराष्ट्रको कपासकी जरुरत हो तो हमे चावल और गन्ना उनको देनाही पडेगा, नही तो हम हमारा अनाज-कपास उन्हे नही देंगे'. विदर्भ आणि महाराष्ट्र हे दोन वेगळे देशच होणार अशा आविर्भावात ते बोलत होते. पण वेगळा विदर्भ झाला तर मागासपणा कसा जाईल, औद्योगिक विकास कसा होईल ह्याचा कोणताही आराखडा त्यांच्या-जवळ नव्हता. जांबुवंतरावांच्या भाषणा-तही तसा कधी नसतो. लेके रहेंगे, मारो, ठोको, ह्या पलिकडे कोणताच कार्यक्रम त्यांच्याकडे दिसत नाही. जांबुवंतरावांच्या ज्या ज्या अनुयायांना भेटलो त्यांच्यापैकी कोणीही मला आर्थिक-राजकीय कारणे सांगू शकला नाही.

विणकरांचा असंतोष आणि भावना-त्मक आवाहन हीच दोन मोठी हत्यारे ह्यांच्या हातात दिसतात.

'नर्मदेपासून गोदावरीपर्यंतचा रुक्मी-णीच्या काळचा विदर्भ आम्हाला हवा' असे अणे सांगत असत. आमची विद-र्भाची संस्कृती वेगळी आहे, असे प्रति-पादन ह्या आंदोलनाचे नेते पहिल्या-पासून करत आले आहेत. ह्या कारणा-साठी वेगळा विदर्भ हवा असेल तर हे सर्व नेते चुकत आहेत असेच म्हणावे लागेल. वेगळेपणाच्या समर्थ-नातले एक उदाहरण मासलेवाईक आहे. पुण्याकडले लोक ठेच लागलो तर 'आई ग' म्हणतात व विदर्भात 'बाप है' म्हणतात. ('आमची संस्कृती मर्दानी आहे, पुण्याकडली बायकी आहे!')

आताही विदर्भ चंडिकेची स्थापना केली आहे. चंडिकेचा आणि विदर्भाचा संबंध काय? पण देवीचे आवाहन करून राजकारण मात्र साधले जाते. विरोध करणारे देवीला विरोध करतात असे सांगून त्यांचा नायनाट करणे सोपे जाते.

परिस्थिती अशी आली होती की ह्या चंडिकेसमोर नंतर नंतर लोकही कमी प्रमाणात जमू लागले होते. नाचगाणी वगैरे करून लोकांना जमवण्यात येऊ लागले होते. सत्यनारा-यण शर्मा नावाच्या ह्यांच्याच पुढाऱ्याने ह्या प्रकाराला विरोध केला. धार्मिक भावनांना आवाहन करणे चूक आहे असे जाहीर सभेत सांगितले. त्याच चिटणीस पार्कातल्या सभेत त्याला बदम मारण्यात आले!

ह्या स्वतंत्र विदर्भाच्या मागणीच्या खटाटोपाला चळवळ म्हणता येईल काय? तसेहि म्हणता येत नाही. चळ-वळ असली तर सातत्याने सभा होतात. कार्यक्रम होतात. चळवळीचे उद्दिष्ट तयार करण्यासाठी शिबिरे होत अस-तात, लोकांचे शिक्षण केले जाते. नाग-पुरात त्या दृष्टीने चाचपणी केली असता तसे काही आढळून आले नाही. इतर एखाद्या प्रश्नाचे भांडवल करून किंवा नेत्यांना सणक आली की एकदम कार्य-क्रम होतात. नंतर थोड्या काळाने सर्व थड पडते. लोकशिक्षण वगैरे काही नाही.

संघटना कोणती आहे? आज छोटे-

सेनाच ही चळवळ चालवते आहे. ' घोटे बोले दळ हाले ' अशा प्रकारची ही संघटना आहे. तत्त्व, कसोट्या, संघटनेचा आराखडा वगैरे काही प्रकार नाही. घोट्यांच्या नावाखाली पैसे खाण्याचेही प्रकार खूप होत असतात.

ह्या आधीही मोठी मजेशीर परिस्थिती होती. वेगळ्या विदर्भाचा नारा देऊन पुढारी लोकप्रिय होत असत. आणि मग हळूच काँग्रेस प्रवेश व मंत्रीपद! कन्नमवार, बियाणी, आगरवाल अशी अनेक उदाहरणे आहेत. लोकांना चियावणे आणि वेगळा विदर्भ मागणे हा मंत्रीपद मिळण्याचा अगदी सोपा व जवळचा मार्ग आहे!

वेगळ्या विदर्भाची चळवळ यशस्वी कोठे झाली आहे? जेथे दहशत निर्माण होऊ शकते तेथे आणि जेथे विणकर बहुसंख्येने आहेत तेथेच!!

ह्या चळवळीच्या पाठिराख्यात समाजहिताला बाधक लोकांची, गुंडांची संख्या कमी नाही. २०।२० वर्षासाठी हवा खाऊन आलेले दादा लोक पद्धतशीरपणे वेगळ्या विदर्भाच्या नावाखाली लूटमार करतात हे आढळून आले आहे. पण सरकार त्याची चौकशी करत नाही. त्या विशिष्ट दादांना शासन केले जात नाही. लोकांचे आर्थिक प्रश्नावरचे लक्ष विचलित करण्यासाठी आणि विरोधी पक्ष खच्ची करण्यासाठी वसंतराव नाईकांना अशा शक्तींचा चांगलाच उपयोग होतो. त्यामुळेच दादा लोकांच्याकडे कानाडोळा करून, चळवळ लोकांच्या डोळ्यात भरण्यासाठी चालत राहील ह्याची काळजी पद्धतशीरपणे घेतली जाते. अशी ही सरकारी आश्रयाने चाललेली (शिवसेनेसारखीच) एक चळवळ आहे.

विदर्भ मागासलेला आहे हे कोणीच अमान्य करत नाही. औद्योगिक विकास विदर्भात झाला नाही, हेही सर्वमान्य सत्य आहे. पण त्याला कारणे कोणती ह्याचा सारासार विचार विदर्भवादी नेते किंवा अनुयायी करत असतील असे वाटत नाही.

काही मूठभर स्वार्थी लोकांच्या टोळीचे महाराष्ट्रातले राज्य हे मुख्य कारण विसरले जाते. महाराष्ट्राच्या राजकारणात बड्या बागाईतदारांचा वरचष्मा आहे. त्यामुळे सामान्य कोरडवाहू शेतकऱ्याची काळजी त्यांना नाही, मग तो श्रीरामपूरचा १ एकरवाला असो, मराठवाडा सोलापूरचा कायम दुष्काळी २० एकरवाला असो किंवा विदर्भातला सामान्य शेतकरी असो. महाराष्ट्रातले भांडवलदारही ग्रामीण औद्योगिकरणापेक्षाही आजच उपलब्ध असलेल्या शहरात मिळणाऱ्या सोयींवर डोळा ठेवून स्वतःचा विकास करू पहाणारे आहेत. ह्या दामचोरांचे प्रतिनिधीच आज राज्य करत आहेत. म्हणूनच मुंबई-पुण्यातला गरीब मजूर आणि मराठवाडा विदर्भातला कोरडवाहू शेतकरी कायम सुखापासून वंचित ठेवला गेला आहे. आपली बदमाषी चालू रहावी ह्यासाठीच हे दरवडेखोरांचे टोळके, द्राक्षसम्राट वसंतरावांच्या नेतृत्वाखाली घोषणांच्या जंजाळात सामान्य माणसाला फसवून,

त्याला गरिबीच्या खाईत लोटत चालले आहे. म्हणूनच कागदावरचे नियोजन आणि प्रत्यक्ष परिस्थिती ह्यात तफावत पडत चालली आहे. घोषणा आणि कृती ह्यांच्यात जमीन अस्मानाचे अंतर पडत चालले आहे. मराठवाडा व विदर्भ मागास का राहिला त्याचे इंगित ह्या चोरांच्या कारभारात दडलेले आहे. हेच लोक वेगळेपणाची भावना वाढीला लावतात, कोंबडचा झुंजवत राहतात. विदर्भवाल्यांनी हे जाणून घेतले पाहिजे आणि मागास भागातल्या लोकांच्या विशेष विकासाची मागणी त्यांनी धसाला लावली पाहिजे.

वेगळचा विदर्भाचे राज्य होऊन काय फरक पडणार ? पुन्हा वैदर्भीय चोरांचे टोळके निर्माण होईल आणि पुसदचा किंवा केवळ नागपूरचा किंवा तत्सम, चोरांच्या सोयीच्या भागाचाच विकास होईल. विणकर विपन्नावस्थेतच जात राहील. सामान्य शेतकऱ्याची गरिबी वाढतच जाईल. मजूराचे हाल होतच राहतील. बहुसंख्य जनसामान्यांच्या दृष्टीने परिस्थितीत कोणताच फरक होणार नाही. द्विभाषिकातून फुटून निघताना किती गुलाबी चित्रे रंगवण्यात आली होती ! मराठी भाषिक महाराष्ट्र होऊनही १३ वर्षात सामान्य माणसाची परिस्थिती सुधारलेली नाही. हरितक्रांती द्राक्षांच्या वेलीवरच फुलली, उसाच्या तुऱ्यावरच डोलली हा धडा पुरेसा नाही काय ?

अन्यायाची पाळेमुळे नेमकी कुठे आहेत ह्याचा शोध विदर्भवाल्यांनी घेतला पाहिजे.

जितका अन्याय विदर्भावर झाला आहे तितकाच मराठवाडघावरही झाला आहे. सोलापूर-नगरवरही झाला आहे. त्यांनाही वेगळी राज्ये द्यायची काय ? सांगलीत उत्तर सांगली—दक्षिण सांगली भांडणे आहेत त्यांना दोन वेगळी राज्ये द्यायची काय ? गल्ली गल्लीमागे राज्ये देण्याची पाळी येईल. लहान राज्ये चांगली हे ठीक आहे. पण किती लहान ? दर तालुक्याचे एक राज्य ? विचार करणे आवश्यक आहे.

चुकीचे नियोजन आणि जनताद्रोही कारभार ह्या मुळावरच घाला घातला गेला पाहिजे. फोडा व झोडा ही कुटील नीती लक्षात घेतली पाहिजे. वेगळचा संस्कृतीचे भ्रामक डावपेच जाणले पाहिजेत. शेवटी सामान्य शेतकरी इकडून तिकडून सारखाच. मजूर विदर्भात काय, मराठवाडचात काय, मुंबई-पुण्यात काय, सारखाच; ह्याचे आकलन व्हायला पाहिजे, तर्कसंगत विचार केला पाहिजे,तरच ह्या प्रश्नातून काही मार्ग निघू शकेल.

● ● ●

सांस्कृतिक मद्रास

# नेत्र लागले मृगाचे पावसाकडे

नलिनी अंबाडे

जिभेला फोड आलेले असावेत आणि त्याचवेळी समोर बशा भरभरून ठेवलेल्या असाव्यात... गरम गरम मिरचीची भजी—खमंग चिवडा न् त्या-वर झक्कपैकी कढत कढत चहा ! जीव नुसता थोडा थोडा होतो नाही का ? पण समजा घेतलाच 'एक घास तरी पंचाईत ! आमच्या मद्रासला आजतरी असंच काहीतरी झालंय ! आमच्या सांस्कृतिक जिभेला जणू वीजकपातीचे जणू फोड आलेत. तसा उन्हाळा आणि वीजकपात तुमच्या महाराष्ट्रातही आहे म्हणा, पण मद्रासच्या वीजकपातीस तोड नाही. ७५% वीजकपात रोजच अन् कधी कधी ९०% सुद्धा. साधी चार आणे युनिटवाली क्षुल्लक वीज अन् तिनेच आमचे ते सारे सांस्कृतिक की काय म्हणतात ना ते सारे जीवनच विस्कळीत केले की हो !

सकाळी पाचाच्या ठोक्याला येणारी दूधवाली, सव्वासहाला येऊ लागली. मी भांडे पदराआड लपवून विचारलं 'एन्नम्मा, ये ईव्वळव् लेट ?' तिने अडचण सांगितली. रस्त्यावरचे दिवे बंद असतात म्हणून उजाडल्यावरतीच मी निघते. मी तावातावाने दूधकेंद्रावरती गेले तर तो म्हणाला 'वीजकपातीने सध्या अर्ध्याच बाटल्या भरतो आहोत. बाकीचे दूध लूज विकतो' सकाळचा इंग्रजी पेपर पूर्वी कसा बाळसेदार असा-यचा... पाण्याच्या नळालाही जणू दृष्ट लागलेली. शाळेत जाण्यापूर्वी मुलांची भुणभूण...' आई गं. इस्त्री पेटत नाहीय. धूर डोळ्यात जातो... विजेच्या थंडगार इस्त्रीकडे बघता बघता मीच गरम होई. दुपारी आढ्याला लटकणारा पंखा बघावा आणि हाता-तल्या मासिकानेच वारा घ्यावा. संध्या-काळी फिरायला जाण्यापूर्वी आरशा-समोर उभे रहावे तोच 'हे' म्हणतात 'कशाला स्नो पावडरचा नासोडा ? बाहेर सगळाच अंधार आहे'

बाकी आमच्या मद्रासचं एक विशेष आहे व ते म्हणजे थंड मोकळी हवा, सूर्य तापतो, पण त्याचे राज्य सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंतच. जरा तो पश्चि-मेला कलतो न कलतो तोवर समुद्राचे वारे सुटलेच. मद्रासला 'स्कायस्क्रॅपर्स' उंच उंच इमारती जवळ जवळ नाही-तच. त्यामुळे ही हवा शहरभर खेळते—अगदी रात्रभर अन् पहाटेसुद्धा. नागपूर—जळगाव अन् भुसावळप्रमाणे जिवाची तगमग इथे नाही. सन्स्ट्रोकची भीति इथे नाही. जरा मोकळ्या भागात या—हवी तेवढी हवा—हवीहवीशी वाट-

णारी हवा!

सुटीच्या दिवशी विचार केला–सिनेमाला जावं. मुद्दाम एअर कंडीशन थिएटरला भारी तिकिट काढून बसण्यासाठी 'ह्यांच्याशी' मी भांडलेसुद्धा. पण आत जातो तर एअर कंडीशनरच नव्हे तर पंखेसुद्धा बंद! तमीळ पिक्चर म्हणजे तीन तास पुरे चालणारा. जीव नुसता घाबरा झाला त्या वातानुकूलित थिएटरमध्ये. काहीतरी थंडगार घ्यावं म्हणून उपहारगृहात गेलो तेथेही पंखे बंद आणि कोमट कोमट 'कोल्ड्रींक'–कारण...

समुद्रचौपाटी म्हणजे आम्हा मद्रासी लोकांचं आवडतं ठिकाण. लांब रुंद अन् अवाढव्य वाळवंटदेखील गर्दीला अपुरे

---


यंदाची महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिके मिळवणारी
आमची दोन विशेष प्रकाशने

डॉ. सुधीर फडके

**कोठे आणि कधीतरी**

किंमत : दहा रुपये

अनिल अवचट

**पूर्णिया**

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पडतेय सध्या. गावातून वाहणारी कूवम नदी सध्याच्या द्रमुक सरकारने प्रथमच साफ करून बांधून काढलीय. दोन्ही तीरावर बाग झाल्यावर फिरण्याची अन् नौकाविहाराची सोय होणार आहे हं. किती चांगले चांगले हिंदी बोलपट सध्या आहेत मद्रासला–धुंद, सीता और गीता, व्हिक्टोरिया २०३–पण रोन एक दोनच खेळ अन् ते पण उकाडच्यातच. गेल्या आठवडचात जपानी डान्सेसची आठवडाभर जणू मेजवानीच होती. मनात विचार केला अल्काझींचे 'इबारागी' नाहीतर निदान जपानी पथकाची नृत्ये तरी बघूयात. त्या हेमामालिनीस भरतनाटचम्साठी हाच महिना मोकळा मिळावा ना? जानी बाबूला कवालींच्या जुगलबंदीस दुसरा कोणता मुहूर्त मिळाला नाही. स्वत:शीच मी चरफडले आणि सरळ समुद्रावर पावले वळविली.

मराठी पंचांगाप्रमाणे येणारा गुढीपाडवा म्हणजेच आंध्रवासीयांच्याही नव्या सालाची सुरुवात. त्याला 'उगादी' म्हणतात. मद्रासच्या गौड सारस्वत संयुक्त मंडळाने आठवडाभर हिंदुस्थानी अन् कर्नाटक संगीतानी शास्त्रोक्त कार्यक्रम गाजवले. तेरा एप्रिलला पडला तमीळ नववर्षदिन–मद्राशांचे उत्साहाला भरतीच जणू–पण दुकाना दुकानातल्या 'सेल'च्या पाटचा मेणबत्त्यांच्या प्रकाशात केविलवाण्या नजरेने पहात होत्या. एखादीच पेट्रोमॅक्सची बत्ती दुकानात मध्यभागी. पुस्तकाच्या दुकानदारांनी सरळ संध्याकाळी कुलूपे ठोकून घरचा रस्ता धरावा. रात्री दहानंतर म्युनिसिपालिटीचे रस्त्यावरील उरलेलेही दिवे बंद... परवा असंच घरी मध्यरात्री चाचपडत परतत असताना समोरून एकच दिवा वेगाने आमच्या अंगावर धावून आला. मला वाटलं असेल मोटार सायकल! पण होती ती गवताची अवाढव्य लॉरी. 'हे' म्हणाले 'त्यालाही वीजकपात लागू असेल कदाचित्'

शेकडो वर्षापूर्वी इल्कंगो याने 'सिलपतीगारम' नामक ग्रंथ तमीळमध्ये लिहिला. चौल राजांचे काळात दक्षिणेत सूवर्णयुग नांदले. कावेरी नदी तंजावरच्या पुढे समुद्रास मिळते. आजही त्याला 'कावेरीपूंटोनम' म्हणतात. ते पूर्वी म्हणे आंतरराष्ट्रीय बंदर होते. त्यालाही आज दोन हजार वर्षे होतील. तर तमीळ नव-वर्षदिनी यंदा तेथे सात मजली वास्तू उभी राहिली. सारे मंत्रीमंडळे 'पूंबूहार' उत्सवास हजर राहिले. येथून पुढे दक्षिण भारताच्या सहलीमध्ये एका नव्या ठिकाणची भर पडली. ही सात मजली आर्ट गॅलरी तमीळ द्राविडियन सांस्कृतिक प्रगतीचे दर्शन घडवणारे म्युझियम होय. पर्यटन खात्यातर्फे त्या गावचा खास विकास होणार आहे. तेथे जायला मिळेल तेव्हा मिळेल. तोवर तर मद्रासलाच राहायचंय–उन्हाळा संपण्याची वाट पहात–अन् मृगाचे पावसाकडे डोळे लावून!

● ● ●

# आ ले पा क

■ एक तक्रार : या देशात सध्या सामान्य माणसाच्या दैनंदिन गरजासुद्धा पुऱ्या होणे मुश्कील होऊन बसले आहे.

याचे कारण सध्या सामान्य माणसाच्या दैनंदिन गरजाच बेसुमार वाढल्या आहेत.

■ एक चित्रपट परीक्षक सांगतात : 'नस्ती उठाठेव' या नव्या चित्रपटात राजा गोसावी भूमिका करत आहे. राजा गोसावी अलीकडे चित्रपटातून जवळ जवळ हद्दपार झाल्यासारखा झाला होता.

कारण राजा गोसावीसाठी 'वरचा मजला रिकामा' झाला होता.

■ 'मराठा'तील नाटक या सदरात शशी भालेकर म्हणतात : काही कलावंत असे असतात की हौशी रंगभूमीवरील थोड्याशा यशानंतर ते व्यावसायिक रंगभूमीकडे आकर्षिले जातात.

आणि व्यावसायिक रंगभूमीवरील यशानंतर ते चित्रपटसृष्टीकडे आकर्षिले जातात; किंवा व्यावसायिक रंगभूमी-अपयशानंतर ते पुन्हा हौशी रंगभूमीकडे आकर्षिले जातात.

■ 'महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे' या मराठीतील लेखात म्हटले आहे : महाराष्ट्राचे सौंदर्य वाढवावे, मुंबई अधिक सुंदर करावी याकडे पर्यटनखाते सतत लक्ष पुरवीत आहे.

तरीच !

■ त्याच लेखात पुढे म्हटले आहे : गोव्यात होणाऱ्या काजू फेणी या मादक पेयात काही औषधी गुणधर्म आहे.

खरं असं आहे की त्या औषधी पेयात काही मादकसुद्धा गुणधर्म आहेत.

●

## भारत सरकारचा पोलादी निश्चय

इकबाल कृष्ण भारती नामे एक भारतीय तंत्रज्ञ आहे. आहे त्याहून कमी खर्चाची पोलाद उत्पादनाची एक पद्धती दहा–अकरा वर्षांपूर्वी भारतीने शोधून काढली. एखादे प्रायोगिक पोलाद उत्पादन-केंद्र काढून ही पद्धती पारखून घ्यावी, अशी विनंती भारतीने भारत सरकारला केली, अशा प्रयोगाला पैसे फार पडतील, ते सरकारी खजिन्याला प्राप्त परिस्थितीत, परवडण्यासारखे नाही, असे उत्तर सरकारने दिले. चिकाटी न सोडता, सरकारचे मन वळवण्याचा प्रयत्न भारतीने चालूच ठेवला. पण आमच्या सरकारचा पोलादी निश्चय भंगला नाही. वास्तविक इकबाल कृष्ण भारतीची पद्धती यशस्वी

ठरती तर पोलादाबरोबर दुय्यम उत्पादन म्हणून इतकी वीज उपलब्ध होणार होती की, तिच्यामुळे पोलाद उत्पादनाचा सारा खर्च बाहेर पडणार होता !

भारतीची ही कल्पना आचरट वगैरे नव्हती. भारतीच्या पद्धतीप्रमाणे पोलाद उत्पादनाचा खर्च कमी होणे शक्य आहे, अशी शिफारस पश्चिम जर्मनीच्या विख्यात हाइनरिख कोपर्स लिमिटेड या पोलाद कंपनीने केली होती. इतकेच नव्हे तर हिंदुस्थान स्टील लिमिटेड कारखान्यातील व्यवस्थेची जोड मिळाली तर प्रायोगिक पोलाद उत्पादन केंद्र अवघ्या एक कोटी रुपयात उभे करता येईल, असेही त्या कंपनीने सुचवले होते. शिवाय यशस्वी होते तर या प्रायोगिक केंद्रातून वार्षिक अर्धा लाख टन पोलादाचे उत्पादन शक्य झाले असते.

आमच्या सरकारने या कल्पक संशोधकाची घोर उपेक्षा केली. इकबाल कृष्ण भारतीने, स्वाभाविकच, आपली कल्पना भारताबाहेर विकण्याचा प्रयत्न केला. यथाकाल त्याला यशही आले. सबंध जगात पोलादाचे सर्वात अधिक उत्पादने करणाऱ्या पश्चिम जर्मनीतील देमाग कंपनीने भारतीची कल्पना नुकतीच विकत घेतली आहे.

देमाग कंपनीकडून आपण पोलाद विकत घेऊ शकतो ! कारण संशोधक भारताने निर्माण केला असला तरी संशोधनावरहुकूम स्वस्त पोलाद पश्चिम जर्मनी निर्माण करणार आहे.

## एक बायको पाहिजे

बायको मिळवणे ही गोष्ट बायको मिळवण्याइतकीच अवघड आहे, असे कोणीतरी म्हटले आहे; आणि कोणीतरी म्हटले नसेल तर मीच म्हणणार आहे. तशी लग्ने सगळ्यांचीच होतात; पण सगळ्यांच्या बायका स्वकष्टार्जित असतात असे थोडेच आहे. पण काही मंडळी मात्र (स्वतःसाठी) बायको हवी, म्हणून जिवाचा कोण आटापिटा करतात. त्या आटचापिटचाची आख्याने लावली तर पुरुषार्थाच्या कितीतरी स्मरणीय कहाण्या सिद्ध होतील. त्या भरीला मी पडत नाही. फक्त एका पद्धतीच्या प्रयत्नाची नुकतीच वाचलेली हकीगत तुमच्यापुढे ठेवतो.

अमेरिकेतील उतहा राज्यातील प्रोव्हो या ठिकाणच्या एका वर्तमानपत्रात कोण्या डेव्हिड ब्रिग्जने पुढील जाहिरात दिली : " पाहिजे : एक बायको निकडीने हवी आहे. पूर्वानुभवाची गरज नाही. त्वरा करा. संपर्क साधा : डेव्हिड ब्रिग्ज; ३७५–४४१६ "

जाहिरात वाचून २१६ (दोनशे सोळा) विवाहबंधनेच्छु युवतींनी त्या डेव्हिड ब्रिग्जशी संपर्क साधला.

मी वाचलेली हकीगत एवढीच त्रोटक आहे. त्या दोनशे सत्राजणांचे पुढे काय झाले ते मला माहीत नाही. अधिक माहितीसाठी आणि अधिक संपर्कासाठी तुम्ही खुशाल डेव्हिड ब्रिग्जशी संपर्क साधू शकता. कारण डेव्हिड ब्रिग्जची निकडीची गरज (फक्त) 'एका' बायकोची होती.

—अनंतराव

सरन्यायाधीश श्री. अजितनाथ रे

# शंभर टक्के राजकीय निर्णय

प्रा. पां. शं. माईणकर

सर्वोच्च न्यायालयाने १९६७ साली गोलकनाथ प्रकरणाच्या संदर्भात घेतलेली भूमिका बदलण्याचा निर्णय होऊन पुरता एक दिवसही होत नाही तोच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आज पावेतो भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासात कधीही घडली नव्हती अशी एक घटना घडली २५ एप्रिल, १९७३ रोजी राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांनी विद्यमान सरन्यायाधीश श्री. एस. एम. सिक्री यांच्या निवृत्तीनंतर तिघा ज्येष्ठ न्यायमूर्तींचा सरन्यायाधिश-पदावरील हक्क बाजूला सारून श्री. अजितनाथ रे ह्यांची सरन्यायधीशपदी नेमणूक केली. राष्ट्रपतींच्या या अनपेक्षित निर्णयामुळे न्यायालयांत आणि संसदीय क्षेत्रात विलक्षण खळबळ उडाली.

राष्ट्रपतींचा निर्णय म्हणजेच संसदीय शासन पद्धतीत वास्तविक मंत्रीमंडळाचा निर्णय असतो. राष्ट्रपती केवळ बोलविता धनी. इंदिरा गांधींनी पंतप्रधानपद स्वीकारल्यापासून आजपावेतो अनेक आश्चर्याचे धक्के जनतेला दिलेले आहेत. परंतु आजपावेतोचे निर्णय आणि हा निर्णय यांच्यामधे महदंतर आहे, आणि म्हणूनच एरवी अत्यंत संयमी म्हणून सर्वदूर वाखाणल्या गेलेल्या श्री. छगला यांनीही आजचा दिवस देशाच्या न्यायपालिकेच्या इतिहासात अत्यंत काळाकुट्ट आहे असे तिखट उद्‌गार काढल्याचे प्रसिद्ध झाले आहे.

ते काहीही असो. एक गोष्ट नक्की की सरकारच्या या निर्णयामुळे प्रत्यक्ष भारतीय संविधानाचा कोठेही भंग झालेला नाही. सर्वोच्च न्यायालयातील न्यायधीशांच्या नेमणुका करीत असताना राष्ट्रपतींनी सरन्यायधिशांचा सल्ला घेतला पाहिजे असे जरी संविधानात स्पष्ट करण्यात आलेले असले तरी सरन्यायाधिशांच्या नेमणुकीसंबंधात मात्र तशी मुळीच आवश्यकता नाही. भारतीय

संविधानाच्या प्रकरण चार मधील कलम १२४ (२) पुढीलप्रमाणे आहे.

Every judge of the Supreme Court shall be appointed by the president by warrant under his hand and seal after Consultation with such of the judge of Supreme Court and of the this Courts in the states as the president may be unnecessary for the purpose and shall hold office till he attains the age of sixty five years provided that in the case of appointment of a judge after then the chief justice the chief jutsice of India shall always be consuleted.

या तरतुदीचा विचार केल्यास या निर्णयामुळेच घटनेचा उपमर्द करण्यात आला अशी जी टीका केली जात आहे ती बरोबर नाही हे स्पष्ट होते.

परंतु कोणतेही शासन केवळ लिखित नियमांच्या आधारावरच राज्यकारभार कधीच करू शकत नाही. अलिखित नियमांनासुद्धा तेवढेच नव्हे क्वचित जास्तच महत्व देण्यात येत असते. ' आपल्याकडे कायद्याचे अधिराज्य आहे ' म्हणून सदैव टिमकी गाजविणाऱ्या इंग्लंडमध्येही कायद्यापेक्षा जास्त महत्व आजही दिले जाते आहे ते Common Law लाच. आणि हा कॉमन लॉ म्हणजे दुसरे तिसरे काही नसून तेथे प्रचलित असलेले संकेत, प्रथा, रूढी, सवयी याच होत. श्री. अजितनाथ रे ह्यांच्या नेमणुकीने घटनाभंग झालेला नाही हे जितके खरे तितकेच घटना अंमलात आल्यापासूनच्या गेल्या तेवीस वर्षांच्या काळात कटाक्षाने पाळण्यात आलेल्या एका निरोगी प्रथेचा यामुळे अंत करण्यात आला आहे हेही खरे आहे आणि म्हणूनच या सर्व प्रकरणाचा देशातील कायदेपंडितांनी नि संसदपटूंनी अत्यंत काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय ठरविण्याचा अधिकार घटनेने संसदेला दिलेला आहे आणि याबाबत संसदेने केलेल्या नियमांनुसार कोणतीही व्यक्ती वयाच्या ६५ वर्षा-पर्यंतच या पदावर राहू शकते. आता-पर्यंत ज्या बारा व्यक्तींनी हे पद भूषविले आहे त्या सर्वांची नेमणूक या पदावर ज्येष्ठतेच्याच आधारावर करण्यात आली होती. निवृत्त होणाऱ्या सरन्यायाधिशाची जागा इतर न्याया-धिशांमधील सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश घेत असे. या प्रथेला एकच अपवाद आतापर्यंत घडला आणि तो श्री. पी. बी. गजेंद्रगडकर ह्यांच्या नेमणुकीच्या वेळेस. पण त्या वेळेस श्री. गजेंद्रगडकर ह्यांच्यापेक्षा श्री. जाफर इमाम हे एकच न्यायाधीश ज्येष्ठ होते आणि त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळेच केवळ हे पद त्यांचेऐवजी श्री. गजेंद्रगडकर ह्यांना देण्यात आले होते. या वेळेस तशीही परिस्थिती नाही. श्री. सिक्री ह्यांच्या-नंतर अनुक्रमाने श्री. शेलाट श्री. हेगडे

आणि श्री. ग्रोव्हर ह्यांची नेमणूक व्हावयास हवी होती पण ह्या सर्वांना डावलून चवथ्या क्रमांकावरील श्री. रे ह्यांना हे पद देण्यात आले नि त्यांचा शपथविधी होऊन लगोलग त्यांनी कार्य-भारही हाती घेतला.

हे सारे प्रकरण वरवर दिसते तितके साधे नाही. या संदर्भात सरकारवर झालेली टीका नि फेरटीका विचारात घेतली तर खालील माहिती उजेडात येते.

१ : पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ज्याप्रमाणे मध्यवर्ती सरकारच्या मंत्री-मंडळावर संपूर्ण हुकमत निर्माण केली आहे, आणि राज्यातील मंत्रीमंडळांनाही आपल्या हातची बाहुली बनविली आहेत, त्याचप्रमाणे न्यायदान विभागा-तही आपल्या धोरणाशी सहमत होतील असेच न्यायाधीश त्यांना हवे आहेत. श्री. रे त्या दृष्टीने त्यांना योग्य वाटले आणि म्हणूनच सरन्यायधीशपदी त्यांची वर्णी लागली.

२ : श्री. शेलाट, श्री. हेगडे व श्री. ग्रोव्हर हे तिघेही प्रतिगामी विचारांचे आहेत व म्हणून क्रांतिकारी स्वरूपाचे कायदे केले गेल्यास या न्यायाधीशांकडून ते घटनाबाह्य ठरविले जाण्याची शक्यता आहे.

३ : श्री. हेगडे ह्यांनी पंतप्रधानांच्या विरोधात निर्णय दिलेला असल्यामुळे त्यांच्यावर पंतप्रधानांची इतराजी झाली आहे.

४ : नुकत्याच निर्णय दिलेल्या मूल-भूत अधिकार विषयक खटल्यात श्री. रे ह्यांनी सरकारच्या बाजूने निर्णय दिला म्हणूनच त्यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

५ : हा निर्णय घेण्यामागे कायदेमंत्री श्री. गोखले ह्यांचा मोठा वाटा आहे. पूर्वी श्री. गोखले ह्यांनी स्वत: उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदावर काम केलेले आहे. या पदाचे वेतनमान अपुरे आहे हे कारण दाखवून त्यांनी या पदाचा राजीनामा दिला व उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात वकिली सुरू केली. ह्या काळात त्यांचे ह्या न्यायमूर्ती-बद्दलचे मत कलुषित झाले होते आणि आता संधी मिळताच त्या मताला वाचा फुटली आहे.

सुप्रीम कोर्टाच्या बार असोसीएशनने या नियुक्तीचा एका ठरावाद्वारे निषेध केला आहे. ठिकठिकाणच्या उच्च न्यायालयांतील बार असोसीएशन्सनीही असेच ठराव केले आहेत. अर्थात काही वकील मंडळींनी या निर्णयाचे स्वागतही केले आहे. पण त्यांची संख्या अत्यल्प आहे हेही तेवढेच खरे. भारताचे माजी अटर्नी जनरल श्री. एम्. सी. सेटलवाड, मुंबईचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. एम्. के. छगला, सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश श्री. जे. सी. शहा व श्री. सिक्री, गुजरात उच्च न्याया-लयाचे माजी न्यायाधीश श्री. के. टी. देसाई, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री. व्ही. एम्. तारकुंडे, प्रसिद्ध विधिज्ञ श्री. एन्. ए. पालखी-वाला वगैरे झाडून साऱ्यांनी या निर्ण-याचा कडक निषेध केला आहे. अर्थात

आर. के. गर्ग सारख्या एखाद्या कायदे-पंडिताला हा निर्णय म्हणजे साम्राज्य-शाहीवर कुठाराघात वाटतो हेही विसरता येणार नाही.

टीकेचा धुरळा कितीही उडो सरकार दरबारी मात्र या निर्णयाचे जोरदार समर्थन करण्यात आले आणि पुढेही करण्यात येईल. १९५८ साली श्री. एम्. सी. सेटलवाड ह्यांच्या अध्यक्षते-खाली नेमण्यात आलेल्या विधी आयो-गाच्या शिफारसीनुसार ही नियुक्ती केली गेली असे सरकारतर्फे सांगितले गेले. पण १९५८ साली केली गेलेली शिफारस पंधरा वर्षांनंतर १९७३ साली, सरकारला प्रथमच कशी आठवली हे मात्र सरकारला सांगता आले नाही. गेल्याच वर्षीच्या मे महिन्यात लोकसभा सदस्य श्री. शंकरदयाळ शर्मा यांनी लोकसभेत याबद्दलचा प्रश्न विचारला असता कायदा खात्यांतील मंत्री श्री. निरंजनसिंग चौधरी ह्यांनी सरकारची इच्छा सध्याची प्रथा बदलविण्याची मुळीच नाही, असे स्पष्ट केले होते. मग आताच या शिफारशींची आठवण कशी झाली? सरकार याबाबत सयुक्तिक युक्तीवाद करू शकलेले नाही.

या प्रसंगामुळे अनेक तज्ज्ञांना अमेरी-केतील १९३०–३२ सालच्या परिस्थि-तीची आठवण झाली असेल. जागतिक मंदीचे सावट दूर करण्यासाठी अमेरिकेचे तात्कालीन अध्यक्ष फ्रँक्लीन रूझवेल्ट यांनी अनेक क्रांतिकारी कायदे कर-ण्याचा प्रयत्न सुरू केला होता. पण हे बहुतेक कायदे अमेरिकेचे सर्वोच्च न्यायालय भराभर घटनाबाह्य ठरवून रद्द करीत होते. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी रुझवेल्टनी एक नवीनच पवित्रा घेतला. सुप्रिम कोर्टाच्या न्याया-धिशांची संख्या त्यांनी स्वतःच्या अधिकारात एकदम वाढविली आणि नवीन न्यायाधीश नेमताना ते आपल्या धोरणाचा पुरस्कार करणारेच रहातील याची खबरदारी घेतली. इंदिरा गांधींच्या मनात असेच काही तरी असावे असा अर्थ या घटनेतून काढला तर त्यांत फारशी चूक होणार नाही.

६ : इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळातच नव्हे तर त्यांच्या अंतर्गत वर्तुळात ज्यांना स्थान आहे असे एक मंत्री श्री. मोहन-कुमार मंगलम् ह्यांचेही नाव याबाबतीत घेतले जाते. श्री. सिक्री ह्यांच्या नेम-णुकीच्या वेळेस जुन्या प्रथा मोडून बाहेरील व्यक्तींची नेमणूक सरन्याया-धीशपदी केली जावी असे प्रयत्न केले गेले होते. त्या वेळेस या पदासाठी श्री. मोहन कुमारमंगलम् यांच्याच नावाची चर्चा ऐकू येत होती. साम्य-वादी विचारांशी जुळते विचार असणारे कुमार मंगलम् यांचे श्री. हेगडे ह्यांचेशी संबंध बिघडलेले होते आणि म्हणून त्यांच्यावरील राग व्यक्त करण्याची संधी श्री. कुमारमंगलम् ह्यांनी या रीतीने साधली असेही म्हटले जाते.

अर्थात श्री. गोखले किंवा श्री. मोहन कुमार मंगलम् ह्यांचेबद्दलचा कोणताही पुरावा सकृद्दर्शनी तरी देता येणार नाही.

श्री. अजितनाथ रे ह्यांची नेमणूक कलकत्ता उच्च न्यायालयात प्रथम १९५७ साली झाली. तेव्हापासून बारा वर्षे म्हणजे १९६९ पर्यंत त्यांनी उच्च न्यायालयात काम केले. एक ऑगस्ट १९६९ पासून ते सर्वोच्च न्यायालयात काम करीत आहेत. सर्वोच्च न्यायालयातील त्यांच्या गेल्या चार वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी क्वचित प्रसंगी सरकारविरुद्ध निर्णय दिलेले असले तरी सर्वसाधारणपणे त्यांचा लौकिक सरकारी पक्षाला उचलून धरणारा न्यायाधीश असाच राहिला आहे आणि म्हणूनच त्यांची नेमणूक करणे इंदिरा गांधींच्या सरकारला सोयीचे वाटले.

भारतातील न्यायदान विभागाच्या स्वातंत्र्याबद्दल, सर्वश्रेष्ठतेबद्दल आणि निःपक्षपातीपणाबद्दल जागतिक कीर्तीच्या अनेक कायदेपंडितांनीही वेळोवेळी कौतुकाचे उद्‌गार काढलेले आहेत. कार्यकारी विभागाने न्यायदान विभागाच्या कार्यक्षेत्रात ढवळाढवळ न करण्याचे घालून घेतलेले बंधन आजवर कटाक्षाने पाळले गेले आहे. पण आजवर तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेली ही प्रथा या रे–प्रकरणामुळे मात्र पुरती पायदळी तुडविली गेली आहे. इंदिरा गांधींच्या काळात नि विशेषतः बंगलोर अधिवेशनानंतरच्या काळात भारतातील संसदीय लोकशाहीला हुकूमशाहीचा वास येऊ लागल्याची तक्रार आजवर अनेकदा केली गेली पण तरीही न्यायदानविभागात कार्यकारी विभागाने निष्कारण ढवळाढवळ केल्याचे उदाहरण मात्र आजवर घडले नव्हते. आता हे समाधान मानायलाही फारशी जागा नाही.

प्रत्यक्ष वस्तुस्थिती अशी आहे, की डावलण्यात आलेल्या तीन न्यायाधीशांपैकी ज्येष्ठ श्री. शेलाट यांना जुलै १९७३ मधे निवृत्त व्हावयाचे होते. म्हणजेच फारतर तीन महिने ते हे अधिकारपद भूषवू शकले असते. नंतर येणारे श्री. हेगडे हे जून, १९७४ मधे नियुक्त होत असल्यामुळे तेही फारतर अकरा महिनेच हे पद भूषवू शकले असते. मात्र त्यांचेनंतर येणारे श्री. ग्रोव्हर हे फेब्रुवारी, १९७७ पर्यंत म्हणजे जवळजवळ अडीच वर्षेपर्यंत या पदावर राहू शकले असते. येथे प्रश्न व्यक्तीचा नाही.

**पण हे सारे जर या क्रमाने झाले असते तर श्री. अजितनाथ रे ह्यांना सरन्यायाधीशपद एक दिवसाकरिताही मिळू शकत नव्हते. कारण त्यांना वयोमर्यादेच्या बंधनानुसार श्री. ग्रोव्हर ह्यांचेपूर्वीच एक महिना म्हणजे जानेवारी, १९७७ मधे निवृत्त व्हावे लागणार होते. या नियुक्तीमागे काही काळेबेरे आहे अशी शंका जी सर्वांनाच येत आहे आणि या नियुक्तीविरुद्ध जो गदारोळ संसदीय नि न्यायालयीन क्षेत्रात उठला आहे तो यामुळेच.**

फार वर्षांपूर्वी मॉंटेस्क्यू या फ्रेंच

तत्वज्ञाने प्रतिपादिलेला सत्ताविभाजनाचा सिद्धांत आजची बहुतेक लोकशाही राष्ट्रे कटाक्षाने पाळीत असतात. आदर्श नि निरोगी लोकशाही रुजण्यासाठी कार्यकारी विभाग, न्यायविभाग नि कायदे विभाग परस्परापासून स्वतंत्र असणे आवश्यक असते. हे साधे तत्व मॉंटेस्क्यूने या सिद्धांतात सांगितले आहे. भारतातील सध्याच्या राज्ययंत्रणेला या सिद्धांताची फारशी मातब्बरी वाटत नाही. जेथे कार्यकारी विभाग न्याय विभागाच्या कक्षेत विनाकारण लुडबुड करू लागतो तेथे स्वातंत्र्य नाममात्र उरते आणि सर्वत्र हुकूमशाहीचा उग्र दर्प लोकशाहीच्या पांघरुणाखाली नागरिक जीवनाची कोंडी करीत असतो. भारतात हे नको असेल, भारताची न्यायदान यंत्रणा पूर्वीप्रमाणेच सुस्थिर स्वतंत्र, निःपक्षपाती आणि पवित्र रहावी असे मनोमन वाटत असेल तर तिची योग्य ती आदब, तिचा योग्य तो मान राखला गेलाच पाहिजे, हा सरळ सरळ राजकीय हेतुंच्या पूर्तिसाठी घेण्यात आलेला शंभर टक्के राजकीय निर्णय आहे. एकदा ही प्रथा पडली तर न्यायधिशामध्येही कार्यकारी विभागाला खूष ठेवण्याची अहमहमिका लागेल आणि त्यात पवित्र न्यायदान यंत्रणेचे मात्र पार खोबरे होईल. तिचे योग्य स्थान आणि तिचा योग्य तो मान ठेवण्याची जबाबदारी आपलीच आहे. आज जर आपण हे केले नाही तर उद्या न्यायदान यंत्रणा पायदळी तुडविली गेली अशी तक्रार करण्याचाही आपल्याला अधिकार रहाणार नाही. भारतीय जनता हे समजू शकेल का ?

● ● ●

---

# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत : चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## शिवनाथबाबू : एक वृद्ध तरुण

बंगाली नववर्ष समारंभाचा कार्यक्रम साधा पण वैशिष्टयपूर्ण होता. श्री. प्रमथनाथ बिशि–बंगालचे विख्यात लेखक हे मुख्य पाहुणे होते. 'गांधी आणि रविंद्रनाथ' ह्या विषयावर ते बोलले. नंतर अध्यक्ष श्री. शंकर प्रसाद मित्र (चीफ जस्टिस) यांचं भाषण झालं आणि नंतर काही चिमुरड्या मुलींनी नृत्य–संगीतिकाद्वारा नव्या वर्षाचं स्वागत केलं. रविंद्रांच्या नववर्ष स्वागतपर काव्यरचनांचे गायन आणि त्यानुसार नृत्य असा हा कार्यक्रम होता. 'ये ये नूतन वर्षा, ये ये वैशाख मासा, तुझं स्वागत असो' अशा अर्थाच्या ओळी...पुढे त्यात निसर्गवर्णन ओतप्रोत भरलेलं...

रविंद्रनाथ रसिक खरेच. त्यांचे लोकही तितकेच रसिक–रविंद्रांच्या काव्याला नृत्याचा साज चढविणारे ! मला गुढीपाडव्याची आठवण आली. आमच्याकडे घरोघरी गुढयातोरणे उभारतात. पण नव्या वर्षाच्या स्वागता-निमित्त सामाजिक कार्यक्रम नृत्यगायनादि रूपाने व्यक्त झाल्याचं स्मरत नाही.

ह्या समारंभाचे वेळीच श्री. शिवनाथ बॅनर्जींची अचानक गाठ पडली.

शिवनाथबाबूंचं वय ७६ वर्षांचं. दाढीचे केस पांढरे व्हायला लागले असले तरी डोक्यावर अजून काळेभोर केस आहेत. उंचपुरे आणि धिप्पाड शरीराचे शिवनाथबाबू आपल्या व्यक्तिमत्वाने इतरांना भारावून टाकतात. सुप्रसिद्ध मीरत बॉंब खटल्यात पकडल्या गेलेल्या आरोपींमध्ये हेही समाविष्ट होते. भारतीय क्रांतीच्या जमान्यात काबूल कंदाहर मार्गे ते रशियात पायी गेले होते. अफगणिस्तान युनिव्हर्सिटीत प्रोफेसर म्हणून राहिले. रशियन भाषेवर त्यांचं प्रभुत्व आहे. त्यांनी भारतीय क्रांतीत सक्रिय भाग घेतला होता. अलीकडे मॉडर्न रेव्ह्यूमधून त्यांच्या साऱ्या आठवणी 'स्मृति ओ बिस्मृति' ह्या शीर्षकाखाली क्रमशः प्रसिद्ध झाल्या.

परवाच्या भेटीत त्यांना म्हटलं–

'मॉडर्न रेव्ह्यूतले लेखांक पूर्ण झाले?'

'होय.'

'पुस्तक करणार आहात?'

'बघायचं. फ्रीडम फाइटर म्हणून काही मिळालं तर त्या पैशातून पुस्तक प्रसिद्ध करीन.'

'तुम्हाला ताम्रपत्र वगैरे नाही मिळालं?'

'ना. ताम्रपत्र ओ पाईनी, कदलीपत्र (केळीचं पान) ओ पाईनी...सी

बॅनर्जी म्हणजे ब्राह्मण नं. ? ब्राह्मणाला जेवायला केळीचं पानदेखील मिळालं नाही.'

आम्ही सगळेच हसलो स्वतःच्या विनोदावर खूष होऊन तेही हसले.

शिवनाथबाबूंना उत्साह भयंकर. हावऱ्याला एक छोटंसं लेप्रसी होम चालवतात. ह्या कारणास्तव श्री. बाबा आमटेंशी संबंध आला. १९७१ च्या सोमनाथ कॅंपला बंगाली तरुणांची एक पलटण आम्ही नेली त्यात तेही सामील झाले होते. कॅंपमध्ये सर्वात वृद्ध तरुण म्हणून त्यांचा गौरव केला गेला. नेहमी काहीतरी उद्योगात ते गढलेले असतात.

नववर्ष स्वागताचा कार्यक्रम संपल्यावर त्यांचा निरोप घेतला तेव्हा म्हणाले, 'उद्या वेलिंग्टन स्क्वेअरला हिंद-मजदूर सभेच्या ऑफिसात ये. आपण बोलू. तिथे आम्ही बेकार भाता कमिटी स्थापन केली आहे. मीच तिचा संस्थापक आणि संचालक आहे.

मी विचारलं–'बेकार भाता कमिटी' हा काय प्रकार आहे ?'

'उद्या तिथे ऑफिसमध्ये ये, मग सगळं सविस्तर सांगेन; दर सोमवारी मी ५ ते ७ संध्याकाळी तिथे जाऊन बसतो.'

मला आश्चर्य वाटलं. ही नवी कमिटी कसली आहे, काय काम करते हे जाणून घेण्याची उत्सुकता मनात बाळगूनच घरी परतले.

●

## बेकार भाता दावी कमिटी

ठरल्याप्रमाणे हिंद मजदूर सभेच्या ऑफिसमध्ये मी जाऊन बसले. शिवनाथबाबूंची भेट झाली. त्यांनी एक छापील कागद समोर ठेवला. त्यावर मोठ्या अक्षरात 'बेकार भाता दावी कमिटी' (Unemployment Insurance Demand Committee) असे शब्द होते. ऑगस्ट १९७२ मध्ये हावऱ्याला प्रेस कॉन्फरन्समध्ये शिवनाथबाबूंनी दिलेल्या भाषणाची ती एक प्रत होती. त्यात त्यांनी म्हटलं आहे–'आजच्या आणि भविष्यकाळातील बेकार लोकांचा विचार करता मी माझ्या ७६ वर्षांच्या वयाला अशी एक बेकार भत्ता कमिटी स्थापन करीत आहे. पुढेमागे तरुण वर्ग माझ्या खांद्यावरचा भार हलका करील व सर्व जबाबदारी स्वतःवर घेईल अशी दृढ आशा मी मनाशी बाळगून आहे.

ह्या कमिटीची मुख्य मागणी म्हणजे 'एकतर आम्हाला नोकरी द्या किंवा बेकारी भत्ता द्या.' मुख्यतः कोणत्याही प्रकारचं का असेना, पण आम्हाला काम हवंय् असा त्यांचा आग्रह आहे. नाहीतर कमीतकमी दरडोई एक रुपया रोज असा बेकारी भत्ता मिळावा. आजच्या काळात एक रुपया रोज पोट भरण्यासाठी फारच कमी पडतो. तरीपण अर्धपोटी राहण्याची कशीतरी सोय होईल व शिवाय नोकरीसाठी अर्ज करणे, त्या अर्जासोबत पोस्टल ऑर्डर किंवा तिकीटे इ. खर्च त्यातून निभवता येईल असेही

त्यांचे म्हणणे आहे. ह्या बेकार भत्ता दाबी कमिटीचे सभासद बहुतेक बेकार लोकच आहेत. आजपर्यंत सुमारे शंभर सभासद मिळाले. शिवनाथबाबूंचे म्हणणे अशा तऱ्हेची कमिटी ठिकठिकाणी स्थापन करण्यात यावी, फक्त बंगाल-मध्येच नव्हे तर संपूर्ण भारतात. त्यांनी एकमेकांशी संपर्क ठेवावा आणि फार मोठ्या प्रमाणावर एक आंदोलन सुरू करावे. सर्व बेकार तरुणांना शिवनाथ-बाबूंचे फार मोठे आव्हान आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी नोकरी करणारांनीही ह्या आंदोलनात सामील व्हायला हवे असेही ते म्हणतात. हे सर्व संपर्क साधण्यासाठी त्यांनी 'बेकार समवाद' (बेकार वार्ता) ह्या नावाचं एक बुलेटिन काढायला सुरुवात केली आहे ह्या बुलेटिनचा पहिला वहिला चारपानी अंक त्यांनी मला दिला व वार्षिक वर्गणी रु. १/– फक्त माझ्याकडून वसूल केली. 'दुसरा अंक केव्हा निघणार ? हे पत्रक साप्ताहिक समजायचे की कसे ?' यावर शिवनाथबाबू म्हणाले– 'ते अजून काहीच ठरले नाही पैशांची सोय झाली की पुढचा अंक निघेल.'

'बेकार-संवाद'च्या ह्या अंकात अनेक बेकार तरुणांचे लेख-कविता इ. साहित्य आहे. 'आमरा बेकार' ही कविता तर उल्लेखनीय आहे. श्रममंत्री डॉ. गोपालदास नाग यांचे छोटेसे निवेदन आहे 'ही आमची मागणी कशाकरिता ?' ह्या शीर्षकाचा संपादकीय मजकूर आहे. आणखी कोणकोणत्या ठिकाणी अशी कमिटी स्थापन झाली आहे. त्याविषयी माहिती आहे. 'बेकारी हटाव' ह्या नावाचा एक लेख देखील आहे. प्रत्येक पानावर वरच्या बाजूला रविंद्रनाथांची दोन दोन वाक्ये उद्धृत केलेली आहेत. ह्या बुलेटिनचे कार्यकारी संपादकांचे काम श्री. सत्यचरण घोष पाहतात.

आता ह्या पत्रकाच्या दुसऱ्या अंकाची


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)

वाट पहाणे आलेच. शिवनाथबाबूंचा हा प्रयोग तसा अभिनव वाटतो. तो यशस्वी न झाला तरी त्याचे महत्त्व राहीलच कारण ह्या वृद्धवयीन तरुण मनाच्या माणसाचे कर्तृत्व त्यामागे आहे. भारतात अन्यत्र अशा तऱ्हेचा काही विचार बेकार तरुणांसाठी केला जातो का हे जाणून घेणेही महत्त्वाचे वाटते. ●

## समीरकुमारचं पत्र

प्रिय समीर,

तुझं पत्र वाचलं. तुझं म्हणणं खरं आहे. कोणालाही पटण्यासारखं आहे. तुला बँकेची नोकरी मिळायला काहीच हरकत नव्हती. पण कुठे माशी शिकली ते कळणं कठीण आहे. वास्तविक बँकेच्या नोकरीसाठी तू अर्ज केलास हे तशी जाहिरात वाचूनच. त्या फॉर्मसाठी तू दोन रुपये खर्च केलेस हे योग्यच झाल. ही गोष्ट मार्च १९७१ ची. हरकत नाही. तुला एक नंबर मिळाला. मग तुझी IQ Test झाली ती ऑक्टोबर १९७२ मध्ये. खरं म्हणजे इतके दिवस तू धीर धरलास म्हणून तुझं कौतुकच वाटतं. अन् पुन्हा तोंडी परीक्षा झाली म्हणतोस? तीही असनसोलला अन् जानेवारी १९७३ मध्ये? तोपर्यंत तू नुसताच वाट बघत बसलास? बाकी तू तरी काय करणार म्हणा. आपल्या देशातील माणसाच्या जीवनात नोकरीची मार्गप्रतीक्षा करण्यात जो कालापव्यय होतो त्याचं काहीच मूल्य नाही हे सत्य आहे. हाही मुद्दा सोडला तरी पुढे जे तू लिहिलंस त्याने माझा जीव कळवळला. तुझं सिलेक्शनसुद्धा झालं होतं; त्या निवडक साठजणात तुझा ३३ वा नंबर होता; पण तुला नोकरी नाही मिळाली. हे साठजण नोकरीला लागले, त्यातला तू ३३ वा कसा वगळला गेलास हा तुझा प्रश्न रास्त आहे, याचं उत्तर काय द्यायचं, कसं द्यायचं हे कळत नाही. आम्हालाच ते आकलन होत नाही, तुझं समर्थन कसं करणार? एक गोष्ट मात्र तू लक्षात ठेव. अनिल म्हणतो त्याप्रमाणे स्वतंत्र, सार्वभौम, प्रजासत्ताक राज्याचा तूही एक घटक आहेस म्हणून तुला सारा अन्याय सहन करायला हवा. अनिलने असेच सहन केले आहे. तुमच्या पिढीच्या सर्व जाणत्या तरुणांना सहन करावे लागत आहे. मला माहीत आहे, आता अनिलप्रमाणेच तूही पटकन पुढचा प्रश्न विचारणार आहेस—मग ह्या देशात लोकशाही आहे काय?

ह्या प्रश्नाचं शाब्दिक उत्तर देत बसण्यापेक्षा मी एकच सांगू इच्छिते—'श्री. बाबा आमटे म्हणतात त्याप्रमाणे स्वातंत्र्योत्तर जन्माला आलेली पिढीच देशाचं उत्तम नेतृत्व करू शकेल. अशा सोन्याच्या क्षणाचीच मी वाट पहात आहे.' अधिक काय लिहू? कळावे...

● ● ●

असं असतानाही ब्रिटिश शस्त्रागारातून तीन क्रॉमवेल टँक चोरीला गेले. टँक ही चोरीला जाण्यासारखी लहानसहान गोष्ट नव्हे. पण तरीही हे घडलं. अगदी डोळ्यांदेखत....




वसंत डोळस

एक टँक = ५००० पौंड, एक फिल्ड गन = २५०० पौंड, तीन अँटी-गन = १००० पौंड, तीन मार्टर = १००० पौंड, एक वायकर्स, ३०३ मशीनगन = ५०० पौंड, एक सब-मशीन गन = २०० पौंड, कोणतेही एक ऑटोमेटिक शस्त्र, एक ब्रिटिश रायफल ३०३ = ७५ पौंड, कोणत्याही कंपनीची रायफल = ५० पौंड, रिव्हॉल्वर = ४० पौंड, गोळ्या प्रति १०० राऊंड = ५ पौंड.

ही एका बक्षिसाची घोषणा होती. आणि ही घोषणा 'हगन्ना कमिटी' या गुप्तचर विभागाने केली होती–

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा सपाटून पराभव झाला. उत्तर आफ्रिकन देशांतून ब्रिटिश सैन्य मागे घेण्याची घोषणा झाली. परंतु दुसऱ्या महायुद्धातील मित्र राष्ट्रे आता स्वतःच्या राजनैतिक स्वार्थासाठी एक दुसऱ्याची वैरी बनू पहात होती. चोर, दरोडेखोर, लफंगे, भाडोत्री सैनिक स्वतःच्या राष्ट्राचे शासनाधिकारी बनण्याच्या प्रयत्नाला लागले.

या सर्वांचं लक्ष होतं ब्रिटिशांच्या लष्करी डेपोवर. त्या डेपोतून हत्यारे



पळविण्याच्या नव्या नव्या योजना पुढे येऊ लागल्या व मोठ्या प्रमाणावर लष्करी साहित्याची लूट करण्यात येऊ लागली. ही लूट इस्त्रायली व अरबांच्या हाती मोठ्या प्रमाणावर पडली. त्यांनी आपली 'ऑपरेशन वुल' ही योजना यासाठीच आखली होती.

तसं पाहिलं तर ब्रिटिश अधिकाऱ्यासारख्या चाणाक्ष व हुशार अधिकाऱ्यांना चकवून चोरी करणे ही सोपी गोष्ट नव्हती. व लाचलुचपतीला फसून बेइमान होणारे ब्रिटिश रक्त नव्हते. त्याचप्रमाणे लष्करी डेपोवरील पहारेकरीही कर्तव्यदक्ष असेच होते. शिवाय अशा प्रकरणी एखादा चोर चोरी करताना सापडला तर एका बंदुकीच्या गोळीसाठी त्याला सात वर्षांची शिक्षा भोगावी लागे असा लष्करी खाक्या होता.

असं असताना देखील ब्रिटिश शस्त्रागारातून (डेपोतून) तीन क्रॉमवेल टँक चोरीस गेले. टँक ही चोरीस जाण्याजोगी बारीक सारीक वस्तु नव्हे. किंवा त्याना लपवून तसे कोठे आणि कसे ठेवणार ?

परंतु हे सारं खरं असताना देखील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या उघड्या डोळ्यां-

देखत हा चोरीचा प्रकार घडला.

हे प्रकरण गुप्तचर विभागाकडे आले तेव्हा त्यांनादेखील या प्रकरणाकडे पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही. त्यांना वाटलं. "टँक गेले कुठे? त्यांना आकाशाने गिळले की, जमिनीत गेले!"

आणि हे चोरीचे प्रकरण घडले. नेमके त्याचवेळी हगन्ना कमिटीच्या उपसमितीने ही बक्षिसाची घोषणा केली. या बक्षिसाच्या जाहीरातीने कुणाच्या तोंडाला पाणीच सुटले असते.

अगदी नजिकच्या काळात इस्त्रायलींची गाठ अरबांसारख्या सुशिक्षित सैन्याबरोबर पडणार होती. त्यांच्याशी टक्कर ही एक अशक्यप्राय: अशीच गोष्ट होती. माणसाला जिवंत राहण्यासाठी जशी हवेची व पाण्याची नितांत आवश्यकता असते तशीच नवोदित राष्ट्रांना शस्त्रांची आवश्यकता असते.

इस्त्रायलच्या हगन्ना या गुप्तचर विभागाने हॉटेल्स, नाईट क्लब, दारूची दुकाने, डान्स क्लब इत्यादी मोक्याच्या ठिकाणी आपले लोक घुसविले. वरील ठिकाणी इस्त्रायलबद्दल सहानुभूती दाखविणारे व प्रसंगी इस्त्रायलसाठी लढणारे सैनिक शोधून काढण्यात आले. त्या सैनिकामधील एक होता कार्पोरल डिक्सन. तो टँक रेजिमेंटमध्ये होता. त्याची प्रेयसी होती एक इस्त्रायली तरुणी. युद्ध संपल्यावर त्या दोघांनी विवाहबद्ध होण्याचं ठरविलं होतं. आपली ड्यूटी संपल्यावर बाकी सर्व वेळ तो आपल्या प्रेयसीच्या घरीच असे.

एके दिवशी संध्याकाळी डिक्सन आपल्या बराकीकडे परतत होता. त्यावेळी त्याला दोन व्यक्ती भेटल्या. त्या त्याच्याबरोबर चालू लागल्या. इतक्यात एकाने त्याच्या कुशीत रिव्हॉल्वरची नळी टोचली व म्हणाला,

"आमच्या बरोबर चल. इकडे तिकडे वळून पाहू नकोस!"

ते तिघेही चालत चालत एका हॉटेलजवळ आले— हॉटेलच्या एका खोलीत त्या दोन व्यक्ति डिक्सनला घेऊन शिरल्या. गल्ल्यावर मालक नव्हता.

त्या रुममध्ये त्यांनी डिक्सनवर प्रश्नांची एकच झोड उठविली.

"आमच्या देशावर आपले प्रेम आहे का? इस्त्रायली लोकांबद्दल आपणाला आदर वाटतो का? तुमच्याजवळ खूप पैसापाणी आहे का?"

शेवटी त्या दोन व्यक्ती त्याला म्हणाल्या,

"जर आपण आम्हाला मदत केली तर आपल्याला हवे ते मिळेल!"

हगन्ना या गुप्तचर विभागासाठी माणसं अगदी वेचक निवडण्यात आली होती. आणि त्यातीलच या दोन व्यक्ती होत्या. त्यांनी डिक्सन पुढे आपला विचार मांडला.

"आपण एक टँक पळवून आणून आमच्या स्वाधीन केला की, त्याचे बदल्यात आपणाला ५ हजार पौंड (सुमारे एक लाख रुपये) मिळतील. आपण आमच्या कटात सहभागी झालात तर सौंदर्यवती युवती मिळेल, घर

मिळेल आणि आमच्या देशात कायमचा आश्रयदेखील मिळेल. डिक्सनला हेच हवे होते.

"येथून आमची तुकडी निघून गेल्यावर माझं काय होईल? कुठे जाऊ? काय करू? आपल्या पाच हजार पौंडावर मला किती दिवस जगता येईल?" डिक्सनने आपलं मन त्यांच्यापुढे खुलं केलं.

"आम्ही तुला घर देऊ. आणि पाच हजार पौंड रोख!"

"पण मला ही रक्कम केव्हा मिळेल?"

"टँक आमच्या स्वाधीन केल्यावर!"

"आपल्या बोलण्यावर मी विश्वास ठेवायचा तरी कसा? टँक मिळाल्यावर आपण अंगठा दाखविला तर काय करावयाचं? तसं झालं तर मीच सापडेल त्यांच्या तावडीत आणि मग कोण येणार आहे माझ्या मदतीला?"

"खरं सांग. तू आम्हाला खरोखरच मदत करणार आहेस काय? इस्त्रायली तरुणीबरोबर विवाहबद्ध होण्याचा तुझा पक्का विचार आहे काय?" हगन्ना कमिटीच्या त्या व्यक्तीने विचारले.

"खरोखरच विवाहबद्ध होऊन नवीन जीवन जगावयास मला सुरुवात करावयाची आहे. कारण या जगात मला आई नाही की, बाप नाही. आपण जर दिलेलं वचन पाळलं तर माझी तयारी आहे!"

हगन्ना कमिटीची एक व्यक्ती म्हणाली,

"बँकेत आपल्या प्रेयसीच्या खात्यावर पाच हजार पौंड जमा केल्यावर तर आपला आमच्यावर विश्वास बसेल ना?"

"आपला हा विचार मला पसंत आहे!"

तिघांनी एकमेकांचे हात हातात घेतले-दुसऱ्या दिवशी याच विषयावर बारीक चर्चा करावयाचे ठरले.

टँक पळवायचे तर काही गोष्टी बारकाईने करायला हव्यात. रस्त्यामध्ये सैनिक ठेवले पाहिजेत. टँक ज्या मार्गाने पळवायचे तो मार्ग सुधारावयास हवा. टँकच्या खुणा रस्त्यावर उमटू नयेत. म्हणून रस्त्यात दगडधोंडे पसरावयास हवेत. कारण जर रस्त्यावर टँकच्या खुणा उमटल्या तर सर्वच मुसळ केरात जाणार होतं.

टँक पळविण्याची तारीख १४ एप्रिल ही ठरविण्यात आली. पण ठरलेल्या वेळी डिक्सनने लाल झेंडा दाखविला. कारण त्याच्या डोक्यात वेगळाच विचार चमकून गेला. लाल झेंडा पाहून हगन्ना कमिटीचे लोक बुचकळ्यात पडले. हगन्ना गुप्तचर विभागाची लगेच तातडीने बैठक बोलाविण्यात आली.

डिक्सनदेखील त्या बैठकीला हजर होता. बैठकीत तो म्हणाला, "मी ही गोष्ट माझ्या जिवलग मित्रांच्या कनावर घातली आहे. आपल्याजवळ पैसे असतील तर एकच काय अनेक टँक आम्ही पळवून आणू. आम्ही अधिकाऱ्यांना सांगू की, गंज लागू नये म्हणून दूर अंतरावरून आम्ही टँक फिरवून आणतो व बाहेर आणल्यावर

तुमच्या स्वाधीन करू पण यावेळी तुम्हीही आम्हाला मदत करायला हवी !"

डिक्सनच्या तोंडून हा विचार ऐकल्याबर हगन्ना कमिटीच्या लोकांच्या आनंदाला पारावार राहिला नाही; पण जास्त टँक पळवून आणावयाचे तर त्यासाठी प्रचंड प्रमाणावर रक्कम द्यावी लागणार व त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची संमती हवी.

लगेच त्यांनी आपला विचार हगन्नाच्या मुख्य कार्यालयाला कळविला. मुख्य कार्यालयानेही लगेच त्यावर मान्यतेचे शिक्कामोर्तब केले. मात्र अर्धी रक्कम डॉलरमधून व अर्धी पौंडातून देण्यात येईल असेही कळविले.

त्याचप्रमाणे हगन्नाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने डिक्सनला सांगितलं,

"आपल्याला हवी ती मदत आमच्याकडून मिळेल. आमच्याजवळ ब्रिटिश सैनिकांचे शेकडो गणवेश पडून आहेत. वेळप्रसंगी आम्ही त्यांचाही उपयोग करू !"

वरिष्ठ अधिकारी मंद स्मित करीत बोलत होता व त्याच्या हाताखालचे कनिष्ठ अधिकारी हसतमुखानं त्याला पाठिंबा देत होते.

"आमच्या सैनिकांना अगोदर टँक चालविण्याचे प्रशिक्षण दिले जाईल. अर्थात ते ब्रिटिश सैनिकांच्या गणवेशात वावरतील. ज्यांना अस्खलित इंग्लिश येते, अशाच सैनिकांची या कामगिरीवर नेमणूक केली जाईल. बाहेर टँक पळविणाऱ्या लोकांना संरक्षण देण्यासाठी एक तुकडी असेल. तीही सर्व ब्रिटिश गणवेशात असेल. ब्रिटिश सैनिकांना गणवेशामुळे आपल्या लोकांचा संशय येणार नाही. त्यामुळे ते आमच्यावर फायरिंग करणार नाहीत. पण आम्ही त्यांच्यावर फायरिंग करू शकू आणि ते सावध व्हायच्या अगोदरच टँक व आपले लोक पसार झालेले असतील. यावर कोणाचे काही मत ?"

कुणी काहीच मत व्यक्त केलं नाही. हाच विचार सर्वसंमत झाला. या प्रकरणाचा हा चवथा टप्पा होता.

मे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात ब्रिटिश सैन्य तेथून मायदेशी परतणार होते. निरोपाच्या दिवशी मोठी मेजवानी होती. आचारी मेजवानीच्या तयारीत गुंतले होते. बिअर आणि ब्रँडीच्या बाटल्यांचा तर ढीग लागला होता. सगळीकडे आनंदाचं वातावरण पसरलं होतं. लोक जात-येत होते. कुणावरच काही निर्बंध नव्हता.

दुपारी साडेतीन वाजता गार्डरुमसमोरून एक रेशन ट्रक कंपाऊंडमध्ये घुसली. पहारेकऱ्याला कोणताच संशय आला नाही. मग डिक्सनने ट्रक तशीच मागे रेटून भिंतीला धक्का देऊन उभी केली. एखाद्या सैनिकाचं ट्रकच्या मागं लक्ष जाऊ नये म्हणून त्यानं असं केलं. ट्रकचं बानेट वर केलं. दुरुस्तीची काही हत्यारेही तेथे ठेवण्यात आली. इतर लोकांना वाटावं की, या ठिकाणी ट्रकदुरुस्तीचं काम चाललं आहे. ट्रकच्या मागे खालच्या फाळक्याच्या आडोशाला ब्रिटिश सैनिकांचा गणवेश परिधान

केलेले हगन्ना कमिटीचे काही लोक होते.

संध्याकाळ झाल्यावर डिक्सन आत बसला. मोटार स्टार्ट केली व थोडी मागे सरकविली. हगन्ना कमिटीचे लोक मागे सरकले व सावध झाले.

डिक्सन खाली उतरला. सावधपणे त्यांच्याबरोबर त्रोटक बोलला व लगेच आपल्या मित्रकंपूकडे आला. त्याचे मित्रही टँक पळविण्याच्या तयारीतच होते. कोणी कोणत्या टँकमध्ये बसायाचे हे डिक्सनने त्रोटक सांगितले. डिक्सनच्या टँकमध्ये तीन हगन्ना कमिटीचे लोक घुसले. लगेच टँक सुरू झाले.

चारही टँक प्रथम चेक पोस्टजवळ गेले. पण पहारेकऱ्याला अजिबात संशय आला नाही. कारण रात्रीही कधी कधी टँक फिरविण्यासाठी बाहेर पडत. टँक चोरीला जातील हा विचारही त्याच्या मनात आला नाही. त्याने हात वर करून एकेक टँक बाहेर सोडले.

शेवटच्या टप्प्यावर मिलिटरीचे शेवटचे चेक ठाणे होते. तेथील पहारेकऱ्यालाही संशय आला नाही. त्याने पोल उचलून बाजूला सारला व टँकला जाण्यासाठी वाट करून दिली.

मिलिटरीच्या हद्दीतून बाहेर पडल्यावर टँक वेगाने धावू लागले. जाताजाता शेवटच्या टँकच्या गिअर-बॉक्समध्ये काही बिघाड झाला. ड्रायव्हरने खूप प्रयत्न केला. पण टँक दुरुस्त झाला नाही. ड्रायव्हर आणि इस्रायली सैनिक टँकमधून बाहेर पडले. त्या टँकचा ड्रायव्हर खराखुरा ब्रिटिश सैनिक परत ब्रिटिश बराकीकडे आला व इस्रायली सैनिक अंधारात पळून गेले.

तो ज्यावेळी इकडे येऊन पोहोचला, त्यावेळी इकडे पार्टी जोरात चालली होती.

एक तासानंतर काही ब्रिटिश सैनिक पार्टीला आले. तेव्हा त्यांनी रस्त्यामध्ये एक टँक नादुरुस्त झाल्याचे सांगितले. तेव्हा मात्र पहारेकरी सावध झाले व अजून बाहेर गेलेले टँक्स परत का आले नाहीत. म्हणून सर्वत्र धावपळ सुरू झाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर ही हकिगत घालण्यात आली.

दोन तास उलटले. या अवधीत टँक पन्नास मैलांपेक्षा अधिक दूर गेले असतील. बाहेर गेलेल्या टँकच्या संदर्भात दोघा पहारेकऱ्यांशिवाय दुसरे कुणालाच काही माहीत नव्हते. ब्रिटिश सैनिकांनी टँकच्या संदर्भात आजूबाजूच्या गावच्या लोकांना विचारले. तेव्हा ते म्हणाले, "टँक ? कसले टँक ?"

हगन्ना कमिटीच्या लोकांनी या प्रकरणी मोठी चतुराई केली. रक्ताचा थेंबही न सांडविता—टँक पळविले. टँक अशा मार्गावरून पळविले की, रस्त्यावर टँकच्या खुणादेखील उमटल्या नाहीत.

दिवस उगवल्यावर लगेच चौकशीची चक्रे फिरू लागली. टँकच्या शोधासाठी विमाने बाहेर पडली. पन्नास मैलांच्या टापूत फोटो घेण्यात आहे. अनेक लोकांना चौकशीसाठी बोलविले; पण काहीच उपयोग झाला नाही.

दिलेल्या वचनानुसार हगन्ना कमिटीने

पृष्ठ ४२ वर

तिरडी ठीक आहे. पण फुलं ?!....



# तिरडी नि फुलं




केशव मेश्राम

दोन दोस्तांनी एकत्र येऊन आपला कवितासंग्रह प्रसिद्ध करणे ही गोष्ट आता रूढ झाली आहे. ‘ तिरडी नि फुलं ’ हा श्री. मदन मुळे आणि सुधीर नांदोडे या मित्रद्वयांनी काढलेला त्यांच्या कवितांचा संग्रह. पैकी नांदोडे हे कवी-बरोबरच चित्रकारही असल्याने त्यांनी मुखपृष्ठ सजावटीचेही काम पार पाडले आहे. तर मुळ्यांपैकी एका व्यक्तीने प्रकाशकाचे. एकंदर भक्कम सहकार्य-भावनेवर निर्माण झालेला हा संग्रह आहे, असे अनुमान काढता येते.

त्यातही ह्या संग्रहाचे कवींनी दोन ढोबळ भाग केले आहेत. ‘ तीरडी ’ हा वीस कवितांचा श्री. मदन मुळे यांचा काव्यप्रांत, तर ‘ फुलं ’ हे एकोणीस कवितांचे दालन श्री. सुधीर नांदोडे यांचे. काही जमातीत व धर्मकल्पनात काळा रंग (काळी शाईसुद्धा) अशुभ-द्योतक मारतात. म्हणून ‘ तीरडी ’तल्या कवितेच्या शीर्षकाखाली लांबलचक काळी ‘ रेघ ’ ओढली आहे. तर ‘ फुलं ’ या संकलनातील कवितांच्या नावाखाली शुभसूचक ‘ केशरी ’ रंगाची आडवी रेषा उठून दिसते आहे. अर्थात ‘ फुलं ’ मधील सगळ्याच कविता खळखळणाऱ्या साफल्यभावनेच्या नाहीत हा भाग निराळा. पण ‘ तीरडी ’तला सूर मात्र अधिक ‘ शोकात्म, एकजिनसी व अंतर्मुखतेकडे झुकणारा ’ असा आहे. ती निर्मिती व ते काव्य विशेष गंभीरपणे आकारास आले आहे याचा अनुभव येतो.

सगळीकडे अपयशाचे चटके खाऊनही श्री. मुळे यांच्या कवीमनाला ‘ इवलेसे हिरवे यशाचे रोपटे ’ हसवीत असते. ‘ अपयशाचा ध्रुवतारा अमावसेच्या अंधारात दिशाभूल ’ करतो. कवी म्हणतो, ‘ माझ्यातला ‘ मी ’ पण जिवंत नसल्याने भ्रष्टावलेला मेंदू ’ काही

आदेश देत नाही व 'आज कविता सुचत नाही.' आतुरतेने, उत्कंठेने स्वप्न पाहणारा हा तरुण कवी, 'मनाच्या द्वंद्वात' आपण पिळवटून निघाल्याची नुसती मनमोकळी कबुलीच देतो असे नव्हे; तर ते स्वप्न 'भंगलेले' असल्याचे सांगून टाकतो. आणि ही श्री. मुळे यांना येणारी कलात्मक आत्मदृष्टीची खूण मानावी लागेल. त्यांची आरंभीची 'तिरडी' ही कविता आणि 'एक किडा' ही कविता त्यांच्याबद्दल आशा करायला लावणाऱ्या आहेत.

श्री. मदन मुळे अनुकरणात खूप घोटाळताना आढळतात. आरंभीची कोणाही कवीची कविता अनुकरणातीत नसते हे मान्य करूनही अशा अनुकरणाचे काही तयार साचे कवीला कायमचा खाऊन टाकतात हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. उदाहरणार्थ— 'चिता' ही कविता, 'प्रियेच्या बापाच्या करड्या नजरेची चिता, तिच्या आईच्या कडक शब्दांचे मीठ, डोळ्याच्या मडक्यात साचविलेले अश्रूंचे पाणी, तडतडणारी कवटी, आत्म्याचे भूत' वगैरे 'रेडीमेड' रूपके इतक्या चपखलपणे वापरते; की त्यातले काव्य संपून 'कॅलक्युलेटेड' गणित सुरू व्हावे किंवा 'मागे वळून' ह्या कवितेत, प्रयत्नाचा कोळी, अपयशाचे किडे, व्हायोलिनचे आर्त स्वर, काव्याचा सागर, चुंबनाचा वर्षाव इत्यादी सांकेतिकतेचे सरकपडदे ते कवितेवर घाईघाईत चढवताना दिसतात. नुसती एखादी शब्दबंधाची वेगळीशी 'काल्पनिक जोडी' म्हणजे कविता हे समीकरण त्यांनी डोक्यातूनच काढायला पाहिजे. वैचारिक ताकदही त्यांनी प्राप्त करण्याची आवश्यकता आहे. कारण 'काळी वाळू' हा एक त्यांचा आवडता 'शब्दप्रयोग' दिसतो. शब्दप्रयोग एवढ्यासाठी की तो धड 'प्रतिक' म्हणूनही अवतरत नाही. मग 'प्रतिमा' रूप धारण करणे तर दूरच. 'क्षीतिजापलीकडे' ह्या एकाच कवितेत 'कडू अनुभवाची काळी वाळू,' पुढे 'क्लेशाची काळी वाळू, पुढे 'सारी वाळू' आणखी काही ओळीनंतर विशाल वाळवंट; असे नुसतेच येते, '???' या कवितेत 'वाळवंटातील काळी वाळू' असा; तर 'आज कविता सुचत नाही' या कवितेत दोनदा 'किनाऱ्यावरची काळी वाळू' असा निरर्थक उल्लेख येतो. 'एक किडा' ही कविता कवीच्या अनुभवातून स्फुरलेली असल्याने आणि 'तीरडी'लाही दाहक असा स्पर्श असल्याने ह्या कवीच्या पुढच्या वाटचालीचा इतका प्रपंच केला. 'प्लटफॉर्म' खूप भ्रष्ट आहे. मर्ढेकरांच्या 'फलाटदादा'चा इतका क्षीण 'पडसाद' उमटावा याचे आश्चर्य वाटण्याइतकी! श्री. मुळे यांनी आरंभाला, आपल्यावरच भक्कम 'पहारा' केला तर ते चांगले लिहू शकतील, असा विश्वास व्यक्त करावासा वाटतो.

श्री. सुधीर नांदोडे यांच्या मुखपृष्ठाच्या रेखीवपणाचे आरंभी सूतोवाच केलेच आहे; पण त्यांच्या कविता अत्यंत सामान्य आहेत. एकोणीस कवितांपैकी

फक्त 'आम्ही' ही त्यातल्या त्यात बरी कविता म्हणावी लागते. त्यातील अखेरच्या ओळीत नांदोडे यांच्यातल्या कवीची थोडी चुणूक जाणवते.

'आम्ही आहोत फक्त जखमा झेलणारे...

आम्ही आहोत फक्त गर्द काळोख्या रातीचे...'

'माणस,' 'काळजीवन' जीवनच असते मरण, बाग, वेडे मन, शोध; या साऱ्या कविता 'भावहीन' व शब्दसुक्या आहेत. म्हणजे शब्द खूप वापरलेत. पण ते आतापर्यंत मराठी कवितेत इतक्या वेळा, इतक्या तऱ्हांनी आणि परींनी वापरले गेले आहेत की ज्यांच्या विचारानेही नकोसे वाटावे. 'रात्रीपुरती' सुक्या झाडावर येऊन बसणारी चिमणी, काही भाववण्याच्या बेतात असताना तिचे 'सामान्यीकरण' होऊन गेल्याचे बघून मन खट्टू होते.

'जगाचा अंत करण्यास' ही साडेचौदा कडव्यांची, अठ्ठावन्न ओळींची एक दीर्घ कविता श्री. नांदोडे यांच्या 'फुलं' संकलनाच्या अखेरीस आहे. भरकटण्यास, शून्याचा शोध घेण्यास, आणि जगाचा अंत करण्यास निघालेल्या कवीमनाचा उत्त्पप्त प्रवास येथे जाणवेल; अशा अपेक्षेने ह्या कवितेकडे पाहिले, तर काहीच हाती लागत नाही. वस्तुत: ती, कवी विं. दा. करंदीकरांच्या कवितेच्या प्रभावातून निर्माण झालेली कविता. ओळीच्या ओळी कवीने जशासतशा उचलल्या आहेत. पण नांदोडे त्यांच्या कवितेचा पसरटपणा व दैन्य झाकू शकले नाहीत. नांदोडेंच्या एकूण कविता अत्यंत असमाधानकारक व वखरल्या शब्दजालात अडकून 'कवितापण' हरवलेल्या अशा वाटतात.

ह्या संग्रहाचे शीर्षक वाचताना मर्ढेकरांचीही एक कविता प्रकर्षाने आठवते. जेथे त्यांनी पृथ्वीला आणि त्यातल्या 'भरलेपणा'ला एकदा परडी, 'फुलांनी भरलेली' असे हे म्हटले तर एकदा 'एरव्ही तिरडी' असे परस्परच्छेदक पण समबल भावनाशय ग्रंथित केले आहेत. मर्ढेकर, विं. दा. करंदीकर यासारख्या, ताकदीच्या लोकांच्या; आठवणी काढणाऱ्या ह्या कविता फार कच्च्या उराव्यात; याची खंत वाटते. तरी त्यात 'तिरडी' ठीक आहे पण 'फुलं'...? इतकेच. ◻

तिरडी नि फुलं
मदन मुळे, सुधीर नांदोडे.
'परिस्थिती' प्रकाशन, डोंबिवली (पूर्व)
किंमत : तीन रुपये. ●

# जला दो इस भारतको !

एक बालबोध कथा

'जला दो इस भारत को !' ही श्री. निशिकांत सी. पाठक या नवख्या लेखकाची पहिली वहिली कादंबरी आहे. कादंबरीत अथपासून इतिपर्यंत हा नवखेपणा ठासून भरलेला आढळतो. अर्थात अशा लेखकांच्या लेखनामागच्या हेतूबद्दल शंका घेतलीच पाहिजे असे

नाही. तो प्रामाणिक असतो; परंतु आपल्याला जे लिहायचे आहे, ज्या माध्यमातून ते मांडायचे आहे त्यावरील त्यांची पक्कड मात्र पक्की असत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या लेखनातून अखेरीस लक्षात राहातो तो लेखनाचा सोस, त्यातला भाबडेपणा आणि प्राथमिकता, अवतीभवती घटना अनेक घडत असतात. त्यांचे काही एक भान असलेला माणूस त्या संबंधात विचारही करत असतो; त्या घटनांमुळे त्याच्या मनात अनेक प्रश्नही निर्माण होत असतात; परंतु अशा घटना प्रसंगाची एकत्र मोट बांधणे किंवा त्यांची नोंद करणे वा नुसतेच प्रश्न एखाद्या व्यक्तिरेखेच्या तोंडी लिहिणे वा मनातील म्हणून व्यक्त करणे म्हणजे आपली लेखनकृती–कादंबरी वा कथा किंवा आणखी काही–सिद्ध करणे नव्हे.

प्रस्तुत लेखकाच्या या 'कादंबरी'त असेच घडले आहे. मुंबईतील शिवसेनेची दंगल, कलकत्त्यातील रविंद्र सरोवर प्रकरण आणि स्वतंत्र तेलंगण चळवळ या तीन घटना एकत्र बांधल्या आहेत आणि त्यांची वर्णने करण्यासाठी एक 'कथा' तयार केली आहे. त्यासाठी या कथेच्या (नवपरिणित)-नायक–नायिकेचा मुंबईपासून कलकत्ता आणि ग्रँड ट्रंक एक्स्प्रेसच्या मार्गावरील कोणतेसे एक स्टेशन (!) असा प्रवास व्हाया काश्मीर (मधुचंद्रासाठी हं) लेखकाने घडवून आणला आहे.

रविंद्र सरोवर दंगलीत नायक मनोहर याची पत्नी मंदाकिनी भ्रष्ट होते आणि सरोवरातून निघालेले तिचे विवस्त्र प्रेत तो पहातो. त्या धक्क्याने भ्रमिष्ट होऊन भटकत रहातो. भटकता भटकता तेलंगणातल्या कुठल्यातरी गावी येतो आणि तिथे चाललेल्या दंगलीत काही तरुण एका मोटारवाल्या तरुणीवर बलात्कार करीत आहेत, असे भ्रमिष्टावस्थेत समजून त्यांच्याशी मारामारी करतो. त्याचे पर्यवसान मनोहरला त्या मोटारीतच जिवंत जाळण्यात होते.

अशी ही अत्यंत बालबोध कथा तितक्याच बालबोध आणि उथळ वळणाने लेखकाने सांगितली आहे. शीर्षकामुळे वाचकांचा गैरसमज झाला तर पंचाईत! यासाठी 'मराठी-कादंबरी' असा खुलासा करण्याची दक्षताही लेखकाने घेतली आहे (!) ¤

जला दो इस भारतको!
निशिकांत सी. पाठक,
प्रकाशक : निशिकांत पाठक, मुंबई.
किंमत : तीन रुपये.

●

# शहाणे पाहुणे

छान नाटुकले

'शहाणे पाहुणे' हे छोट्यांसाठी लिहिलेले एक प्रयोगक्षम, मनरंजन करणारे नाटुकले आहे.

शुभदा नावाच्या एका छोट्या मुलीला 'अंतराळातून भटकणारी तबकडी' पाहून पडलेले हे एक अद्भुत स्वप्न आहे. परग्रहावरील एक पाहुणा

पृथ्वीतलावर छत्रपती शिवाजी महाराजांना भेटण्याच्या, त्यांच्याशी बोलण्याच्या इच्छेने येतो. एवढेच नव्हे, तर त्याला जागतिक युद्ध खेळायचीही इच्छा असते. असा हा अद्‌भुत पाहुणा आपल्या यानातून पृथ्वीवर येतो. पण शुभदाचे आजोबा या पाहुण्याला दाद देत नाहीत आणि तिची आजी आपला नातू नितीन याच्या करवी पाहुण्याला चतुराईने शह देवविते. अखेरीस त्याच ग्रहावरचे आणखी दोन पाहुणे येतात आणि पहिला पाहुणा परग्रहावरून पळून आलेला वेडा असल्याचे सांगतात. ते त्याला परत घेऊन जातात.

सौ. गांगल यांचे नाव बाल साहित्याशी चांगल्याप्रकारे निगडीत आहे. त्याचे प्रत्यंतर या नाटुकल्याच्या लेखनातली सफाई देते.

परीकथेतील अद्‌भुतरम्यता, शास्त्रीय चमत्कारांतील अद्‌भुतता या बरोबरच इतिहासातील घटना यांचे बालवयाला कमीजास्त प्रमाणात आकर्षण असते. लेखिकेने त्या सर्वांचा या नाटिकेत चतुराईने वापर केला आहे. शुभदा, नितीन, त्यांचे आजोबा-आजी, पाहुणा या प्रमुख व्यक्तिरेखांबरोबरच 'कमला पंतप्रधान' या अगदी किरकोळ व्यक्तिरेखेचे लक्षात राहील असे वेधक चित्रण लेखिकेने केवळ चारसहा संवादातच साधले आहे.

सुरुवातीला शुभदा-नितीनचे आजोबा टी. व्ही. वर भाषण करीत आहेत असा प्रसंग आहे आणि तोच प्रेक्षकांसमोर घडतो आहे, असे लेखिकेने कल्पिले आहे. पण मग त्याचे चित्रिकरण दर्शविणारा एकतरी टी. व्ही. कॅमेरा सूचित व्हायला नको काय? विशेषत: एरव्ही सर्व बारीक सूचना दिल्याचे पाहिल्यानंतर हे अधिकच खटकते! ◻

—जयवंत चुनेकर

'शहाणे पाहुणे':
सौ. सुमन गांगल
शिरीष प्रकाशन, मुंबई २८.
किंमत एक रुपया पंचवीस पैसे.

● ● ●

---

## टँक चोरीला जातात

पृष्ठ २९ वरून

डिक्सन व त्यांचे सहकाऱ्यांना ठरल्याप्रमाणे रक्कम दिली.

ब्रिटिश सैन्याला टँकही कोठे आढळले नाहीत व डिक्सन व त्याचे सहकारीही सापडले नाहीत. डिक्सनला हवे असलेले सर्व काही मिळाले.

पुढे पहाता पहाता या घटनेला पंधरा वर्षे झाली. पुढे अरब आणि इस्रायलचे युद्ध जुंपले. सुएझ कालव्याच्या रोखाने इस्रायली टँकची तुकडी वेगाने पुढे येत होती. त्या तुकडीत सर्वात पुढे तीन ब्रिटिश बनावटीचे ब्ल्यु. डी. क्रॉमवेल टँक होते. इस्रायलींची 'ऑपरेशन बुल' योजना यशस्वी ठरली आणि ब्रिटिशांच्या हातावर अखेर त्यांनी तुरीच दिल्या.

● ● ●

# नवबौद्ध समाज आणि इतर दलित

## म. दु. ताम्हानेकर

'माणूस 'च्या १४ एप्रीलच्या अंकात श्री. अनिल बर्वे यांचा 'एक सफर वेदनांची !' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. यातील श्री. बर्वे यांच्या वेदना किती हे समजत नाही. दलितांवर होणारे अत्याचार हा त्यांना गमतीचा विषय वाटतो. तेव्हा त्यांना याबद्दल काय वेदना होत असतील हे स्पष्ट आहे. हा लेख 'बावडा बहिष्कार प्रकरणा' च्या आधारे लिहिलेला आहे. आता हे प्रकरण कोर्टात गेलेले असल्यामुळे मला त्याबद्दल येथे चर्चा करावयाची नाही. तसेच, श्री. बर्वे यांनी या प्रकरणातील प्रमुख सूत्रधार श्री. शहाजीराव पाटील यांचे जे गोडवे गायिले आहेत त्याबद्दलही मला काही म्हणावयाचे नाही. असे धंदेवाईकदृष्टीने लिहिणे क्षम्यच ठरेल.

या लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांची चळवळ, रिपब्लिकन पक्ष यांच्याबद्दल जी खोडसाळ विधाने केली आहेत आणि महार समाज आणि इतर अस्पृश्य वर्गीय लोक यांच्यात वितुष्ट निर्माण करण्याचा जो प्रयत्न करण्यात आला आहे त्याचा मात्र मला समाचार घ्यावयाचा आहे.

बावड्यात जे महार लोक आहेत ते सध्या बौद्ध झालेले आहेत. श्री. बर्वे यांनी त्यांना पुन: पुन्हा महार म्हणण्यात कोणता मतलब साधला समजत नाही. महार म्हटल्याने कमीपणा येतो असे मी मानीत नाहीत. पण जे नाही त्याचा उच्चार करणे आणि आहे त्याचा उच्चार न करणे ही बर्वेनीती मी समजू शकत नाही. हे बौद्ध लोक व मातंग समाजाचे लोक यांच्यात वैर आहे, त्यांच्यात मारामाऱ्या होतात हे खरेही असेल. अशी अपवादात्मक भांडणे इतरत्रही असू शकतील. पण त्याचा संबंध रिपब्लिकन पक्षाशी कोठे येतो? रिपब्लिकन पक्षात महार लोक आहेत, ते आपल्या जमातीचे धोरण पुढे रेटतात, त्यांनी नवा महार जातीयवाद निर्माण केला ही लेखकाच्या कल्पनेची झेप फारच पुढे गेलेली आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीचा अभ्यास करणारांना हे कळून चुकले की, सुरुवातीपासून ही चळवळ सर्व पददलित समाजाच्या अभ्युदयासाठी आहे. महार, चांभार, मांग हा भेद या चळवळीत कधीच निर्माण झाला नाही. बाबासाहे-

यांनी महाडला आपल्या चळवळीचे रणशिंग फुकले ते महाड येथील चर्मकार बंधूंच्या तक्रारीवरून. म्हणजे सुरुवातीलाच चर्मकार बंधूंनी या चळवळीत पुढाकार घेतला होता. त्यानंतर बाबासाहेबांनी ' स्वतंत्र मजूरपक्ष ' स्थापन करून राजकीय चळवळ केली तीही व्यापक पायावर. यात सर्व धर्मांचे व सर्व जातीचे लोक होते. त्यानंतर क्रिप्समुळे बाबासाहेबांना दलित फेडरेशन पक्ष काढावा लागला. हा पक्ष पददलित समाजातील लोकांपुरता मर्यादित होता हे खरे. त्यात पददलित वर्गातील सर्व लोक होते. त्याच्या चिटणिसपदी श्री. राजभोज या चर्मकार (सध्याच्या बौद्ध) नेत्याची नियुक्ति बाबासाहेबांनी केली होती. श्री. देवरूखकर या दुसऱ्या चर्मकार नेत्याने तर या पक्षात राहून १९४८ साली हौतात्म्य स्वीकारले होते. १९५४ साली बाबासाहेबांनी ' रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ' या पक्षाची घोषणा केली होती. हा पक्ष श्री. बर्वे म्हणतात त्याप्रमाणे केवळ पददलित लोकांपुरता त्यांना मर्यादित ठेवायचा नव्हता. सर्व विरोधी पक्षांच्या सहकार्याने सत्ताधारी पक्षाला पर्यायी पक्ष म्हणून तो स्थापन करावयाचा होता. या घोषणेनंतर बाबासाहेबांचा बराचसा काल आजारीपणात गेला. त्यांच्या आवाहनालाही पुरेशी साथ विरोधी पक्षाकडून मिळाली नाही. म्हणून त्यांना आपल्या हयातीत हा पक्ष स्थापन करता आला नाही. त्यांचा हा व्यापक विचार त्यांच्याबरोबरच गेला. त्यांच्या पश्चात त्यांच्या अनुयायांनी ३ ऑक्टोबर १९५७ रोजी नागपूरला या पक्षाची स्थापना केली. या पक्षात इतर विरोधी पक्षातील लोकांना आणता आले नाही हे कटु सत्य आहे. पददलित समाजातील लोक मात्र त्यात होते. सर्व वर्गातील लोक होते. या पक्षाचे सुरुवातीचे अध्यक्ष तर रा. ब. एन्. शिवराज हे त्यावेळचे मद्रासी नेते होते. हयातीपर्यंत तेच अध्यक्ष होते. महाराष्ट्राप्रमाणे उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, मध्यप्रदेश या उत्तरेकडील आणि मद्रास, आंध्र, म्हैसूर या दक्षिणेकडील राज्यात, गुजराथ राज्यात या पक्षाची वाढ झाली होती. आज जरी पक्षाची वाताहात लागलेली असली तरी सुरुवातीला हा पक्ष भारतभर भक्कम पायावर उभा होता. आणि महाराष्ट्र राज्यातील महार जरी प्रामुख्याने या पक्षात होते तरी इतर राज्यात इतर अस्पृश्य वर्गीय लोकांचा भरणा विशेष होता. उत्तर प्रदेशात चर्मकार बंधूंचे वर्चस्व होते. आजही त्यांचेच वर्चस्व आहे. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकारही केला आहे. या राज्यातील मुसलमान बांधवही या पक्षात आहेत. विधान सभा-लोकसभेवर निवडून गेलेले आहेत. महाराष्ट्रातही केवळ महार समाजाचेच लोक या पक्षात आहेत हे खरे नाही. चर्मकार, मातंग या समाजाचे लोकही या पक्षात आहेत. दौंडचे श्री. आर. जी खंडाळे हे मातंग समाजातील नेते या पक्षाचे नेतृत्व करीत होते व आजही करताहेत. म्हणून

या पक्षाचे खुळे नेते (बर्वे उवाच– जगातील सारे शहाणपण श्री बर्वे यांच्या वाट्याला आल्याने रिप. पक्ष नेत्यांच्या अंगी खुळेपण आले असावे.) या लोकांची विचारपूस करीत नाहीत, या म्हणण्यात काय अर्थ आहे? आता काही लोकांना या गरीब पक्षापेक्षा काँग्रेसमध्ये जाणे फायदेशीर वाटते. काँग्रेसवर त्यांची निष्ठा आहे, त्यांचे स्वातंत्र्यप्रेम उतू जात आहे म्हणून ते काँग्रेस प्रवेश करीत नाहीत. आजही बौद्ध समाजातील लोक काँग्रेसमध्ये जात आहेत. याचेही हेच कारण. या एकंदर पार्श्वभूमीवर या पक्षात केवळ महार लोक आहेत, ते जमातवादी व जातीयवाद धोरण पुढे रेटतात आणि नवा महारवाद निर्माण करतात हे लेखकाचे विधान अगदीच अर्थशून्य वाटते.

बाबासाहेब महारांनाच प्रतिपरमेश्वर वाटतात, इतर अस्पृश्यांना वाटत नाहीत हे लेखकाने सांगण्यात काय अर्थ आहे? हा खोडसाळपणा करण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते. बाबासाहेबांकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीने पहाण्याचाच हा परिणाम आहे. बाबासाहेबांना कोणी प्रतिपरमेश्वर मानावे, कोणी मानू नये. ज्याच्या त्याच्या मर्जीचा प्रश्न आहे. काळ याचे उत्तर देणार आहे. एके काळचे बाबासाहेबांचे कट्टर विरोधक असणारे अत्रेंसारखे लोक बाबासाहेबांना पुढे प्रतिपरमेश्वर मानू लागले होते. आजही विरोधकांकडून बाबासाहेबांचा गुणगौरव होत आहे. आणखी काही काल गेल्यानंतर त्यांचे अधिक मोठेपण जगाला दिसेल. तेव्हा ते कोणाला प्रतिपरमेश्वर वाटतात, कोणाला वाटत नाहीत हा प्रश्न अप्रस्तुत आहे.

## बाबासाहेबांच्या चुका

श्री. बर्वे यांनी बाबासाहेबांच्या पुढील तीन चुका दाखविल्या आहेत.

१. सदैव स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहिले.

२. विभक्त मतदार संघ मागून फुटीरतावादी व संसदीय पुढारीपण उभारले.

३. सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध लढणाऱ्या कम्युनिस्टांचा त्यांनी भांडवलदारांपेक्षा जास्त तिरस्कार केला.

स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीची श्री. बर्वे यांची काय कल्पना आहे समजत नाही. निव्वळ राजकीय स्वातंत्र्य म्हणजे स्वातंत्र्याची राष्ट्रीय चळवळ नव्हे. त्याच्या जोडीला सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्यही हवे. नाहीतर राजकीय स्वातंत्र्याचा डोलारा कोलमडल्याशिवाय राहणार नाही. या देशात स्वातंत्र्याची राष्ट्रीय चळवळ नवी नाही, अशी कितीतरी राजकीय स्वातंत्र्य आली व गेली. आर्थिक स्वातंत्र्यासाठी साम्यवादी व समाजवादी संघटना उभारल्या गेल्या. पण सामाजिक स्वातंत्र्याचा प्रश्न कोणीही हाती घेतला नव्हता. या देशातील साधूसंत, सुधारक, विचारवंत यांनाही हे सामाजिक समतेचे कार्य करता आले नाही. म. फुले व त्यानंतर बाबासाहेब हेच या कार्याचे प्रवर्तक झाले. स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय

चळवळीचाच हा एक भाग होता. श्री. बर्वे यांना अभिप्रेत असलेल्या राजकीय स्वातंत्र्याची कैफियत तशी बाबासाहेबांनी लंडनमधील पहिल्या गोलमेज परिषदेत मांडली होती. म. गांधींच्या अगोदर बाबासाहेबांनी सामाजिक समतेचे जे अपूर्व कार्य केले तेच बरोबर होते असा निर्वाळा खुद्द या चळवळीतील क्रांतीकारकांचे अग्रणी श्री. अच्युतराव पटवर्धन यांनी अलीकडेच दिला आहे. तेव्हा बाबासाहेब स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहिले या म्हणण्यात अर्थ नाही.

स्वतंत्र मतदारसंघाची मागणी न्याय्य होती. गेल्या कित्येक निवडणुकांच्या निकालावरून हे सिद्ध झाले आहे. इतर समाजाची मते दलित फेडरेशनच्या उमेदवाराला पूर्वी मिळाली नव्हती किंवा सध्या रिपब्लिकन पक्ष उमेदवाराला मिळत नाहीत हा अनुभव आहे. अर्थात संयुक्त मतदार पद्धती यशस्वी झालेली नाही. या मतदान पद्धतीने अल्पसंख्य मतदानाची टक्केवारी मिळविणाऱ्या पक्षाला सत्तेवर येता येते. बहुसंख्य टक्केवारी असलेले विरोधी पक्ष सत्तेबाहेर रहातात. म्हणून ही पद्धती रद्द करावी अशी मागणी इतर विचारवंतांनी केली आहे. काहींनी प्रमाणशीर मतदान पद्धतीची, मिश्र मतदान पद्धतीची मागणी केली आहे. बाबासाहेबांनी आपल्या बुद्धीबळावर हा न्याय्य हक्क ब्रिटिश सरकारकडून मिळविला होता. पण म. गांधींनी प्राणांतिक उपोषण करून तो हक्क हिरावून घेतला. बुद्धीने जी गोष्ट करता आली नाही ती अशा तऱ्हेने मरणाची भीती दाखवून महात्म्याने केली. असे हे महात्मे दलित समाजाच्या आदरास कसे पात्र होतील? यात फुटीरता होती, संसदीय पुढारीपण होते हे म्हणण्यापेक्षा पददलित समाजाला न्याय मिळणार होता. तो या समाजाला मिळाला नाही ही या देशातील राजकारणाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध लढणाऱ्या कम्युनिस्टांचा बाबासाहेबांनी तिरस्कार केला यात काही गैर नाही. कम्युनिस्ट आर्थिक शोषणाविरुद्ध लढत असले तरी सामाजिक शोषणाविरुद्ध त्यांनी फारसे काही केले आहे असे वाटत नाही. त्यांची निष्ठा या देशापेक्षा रशिया, चीन या कम्युनिस्ट राष्ट्रांवर अधिक आहे. देशाभिमानी बाबासाहेबांना ही गोष्ट कशी सहन व्हावी? म्हणून त्यांचा तिरस्कार भांडवलदारांपेक्षा जास्त झाला असेल तर ते समजण्यासारखे आहे. नव्हे समर्थनीयच आहे.

● ● ●

कलोपासकांची पहिली एकांकिका

# एक रंगलेला 'सामना'

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेने एप्रिल-मध्ये सुरू केलेल्या एकांकिका वर्ष संल्कपापैकी पहिली एकांकिका झाली 'सामना'! ही एकांकिका सादर करण्यापूर्वी एकांकिका संकल्पाचे प्रयोजन कोणते आहे, हे विशद करून सांगणारा एक अनौपचारिक चर्चा-संवाद झाला. त्यामध्ये एकांकिका निवड, नेपथ्य, कलाकारांची भूमिका, प्रेक्षकांचे स्थान किंवा संबंध, आर्थिक अपेक्षा वगैरे वगैरे गोष्टींच्याबाबत संस्थेची भूमिका स्पष्ट करण्यात आली. एखाद्या पत्रकाद्वारा ती भूमिका प्रकट करण्यापेक्षा अशा चर्चात्मक संवादातून सांगण्याची कल्पना वेगळी आणि चांगली आहे. पण तो चर्चा-संवाद आहे यापेक्षा अधिक आटोपशीर हवा होता. त्याचा विस्तार जाणवला. पण त्याच संवादातून एकांकिकेची प्राथमिक तयारी करण्याची आणि प्रेक्षकाला योग्य दिशेला नेण्याची कल्पना अभिनव आणि सहजस्फूर्त होती.

'सामना' ही सतीश आळेकरांची एकांकिका. दोन म्हातारे क्रिकेटचा सामना पाहण्यासाठी येतात. सामना पाहता पाहताच आयुष्यातील सुखदु:खाची देवाणघेवाण शब्दांनी करतात. सामना संपण्याच्या आतच त्यातला एकजण निघून जातो. तिथेच एकांकिका संपते. एकांकिकेला रूढ अर्थाने कथा नाही. तशी तो अभिप्रेतही नव्हती. कारण आळेकरांनी आपल्या एकांकिकेत घटना-प्रसंगापेक्षा व्यक्तिरेखनाला, मानसिक विश्लेषणाला अधिक प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही एकदा 'सामना' हे रूपक घेतल्यावर त्यातल्या अनेक तपशीलातील गोष्टींभोवती ते रेंगाळत राहिले. बोलिंग, सेंचुरी, अंपायर्स, कॅप्टन, आऊट-नॉटआऊट इत्यदी शब्दाभोवती ते फिरत राहिले. या तपशीलातून मानवी जीवनाचा चाललेला सामना आणि त्यातील कारुण्य, लेखक समर्थपणे व्यक्त करू शकला नाही. त्या रूपकाच्या आधारे निसटते संदर्भ देऊन, काही ठिकाणी शब्दांची वाक्यांची द्वर्थी योजना करून आशयघनतेच्या प्रवासाची दिशा पकडण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. पण तो मर्यादित अर्थानेच !

लेखनातील उणीवा मान्य करूनही

एकांकिकेचे प्रयोगमूल्य लक्षात घेण्या-जोगे आहे. माधव वझे यांनी 'सामना'चा प्रयोग सर्व कलात्मक सामर्थ्यानिशी सादर केला. त्यांनी स्वत: त्यात एका म्हाताऱ्याची भूमिका केलेली होती. त्यांचे दुसरे साथीदार होते बाबा देसाई. दोघांनीही विशिष्ट लकबींनी दोन स्वतंत्र आणि जिवंत म्हातारे साकार केले. त्यांचा अभिनय पाहत असताना ते कोणाचीही बोलण्या-चालण्याची नक्कल करताहेत असे वाटत नव्हते. म्हाताऱ्यांचे 'टाइम्स' होऊ नये याची काळजी दिग्दर्शकाने घेतली होती. या एकांकिकेची मूळची जात अत्यंत संथ, परिणामी कंटाळवाणी होणारी. पण दिग्दर्शकाने एकांकिकेचा 'मूड' ओळखून त्याच्या संथ गतीतील पकड कायम ठेवण्यासाठी स्टेजवरील 'बिझिनेस'चा उपयोग उत्तमरीतीने करून घेतला होता. सामना एकाच ठिकाणी बसून पाहण्याची कल्पना असल्याने 'मुव्हमेंटस्'ना वाव नव्हता. त्यामुळे तर कंटाळवाणेपण अधिकच वाढले असते. पण तसे झाले नाही. कारण शब्दामधला तपशील अनेक बारीक सारीक गोष्टींनी भरून काढला होता. (विशेषत: डबा खाणे, च्युइंगम-खाणे, कॉफी पिणे इत्यादी.) कॉमेन्ट्रीचा वापर हा एकांकिकेच्या परिणामाला साथ देणारा होता. माधव वझे यांनी नट आणि दिग्दर्शक अशा दोन्ही भूमिका समर्थपणाने पेलल्या. बाबा देसाई हे एक गुणी नट आहेत. 'कालाय तस्मै नम:' नाटकातील त्यांची छोटीशी भूमिका स्मरणीय होती. संथ लयीतील त्यांची बोलण्याची एक विशिष्ट पद्धती आहे. त्याचा उपयोग काही भूमिकांसाठी करून घेता येण्यासारखा आहे. तो उपयोग या एकांकिकेत उत्तमरीतीने झाला.

या एकांकिकेचा मी पहिला आणि चौथा प्रयोग पाहिला. चौथ्या प्रयोगात भूमिकांची अदलाबदल केली होती. नटांना अभिनयाचे शिक्षण आणि आव्हान मिळण्याच्या दृष्टीने ही स्वाग-तार्ह गोष्ट आहे. मी पाहिलेले दोन्ही प्रयोग समरसून झालेले वाटले. चौथ्या प्रयोगात माधव वझे यांनी बदलून केलेल्या भूमिकेत आवाजात जाणीव-पूर्वक बदल केला होता. त्या बदललेल्या आवाजातील एक ओढलेला वरचा स्वर आणि काही वेळचे मुद्राभिनयाने दिलेला प्रतिसाद हे प्रेक्षकांतून हास्याची दाद अकारण घेत होते. ती गोष्ट प्रयोग परिणामाला हानिकारक होती.

एका अर्थाने या एकांकिकेचे प्रयोग मुक्त वातावरणात झाले. नेपथ्य म्हणून चार-सहा फ्लॅटचे तुकडे, चारदोन खुर्च्या यांचाच काय तो वापर होता. मेकप् प्रेक्षकांसमोरच केला जात होता. थोडी-फार प्रकाशयोजनेची साथ होती. इतक्या किमान वातावरणात केलेला प्रयोग मनावर ठसला, हे विशेष. प्रेक्षकांचा प्रतिसाद चौथ्या प्रयोगाच्या वेळी चांग-लाच होता. (जवळ जवळ दोडशे प्रेक्षक तरी असावेत.) प्रेक्षकांनाही ही एकांकिका प्रयोग-कल्पना आता सुखाची वाटली आहे, असे दिसते. हाच प्रतिसाद पुढील एकांकिकेला राहील, अशी आशा आहे. 'टायपिस्ट' ही 'मे' महिन्यातली एकांकिका दिग्दर्शित करीत आहेत वासुदेव पाळंदे! ● ● ●

## विकृत दृष्टीने केलेले समालोचन

पृष्ठ २ वरून

तसे कोणी करीत असेल तर त्याविषयी नापसंती अवश्य प्रगट झालीच पाहिजे, असे मीही मानतो.

तथापी विवेकानंदांशी त्यांचेपेक्षा कमी गुणवत्ता असलेल्या व्यक्तीची तुलना झाल्यावर जेव्हा आपल्याला राग येतो तेव्हा विवेकानंदांची महत्तमत्ता आपण समजून घेतली आहे, असे गृहीत धरले जाते. श्री. दामले याचे बाबतीत तशी शक्यता गृहीत धरता येत नाही असे त्यांच्या लेखावरून दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. ते कसे ते मी पुढे सांगणारच आहे. तत्पूर्वी श्री. दामले यांनी जे 'किस्से' दिले आहे त्यांचा खरेखोटेपणा पाहू.

संमेलनाच्या उद्‌घाटनाच्या वेळी मंडपाच्या बाहेर असलेल्या दोन 'अत्यंत गरीब महिलांना' स्वयंसेवकाने 'हिडीस फिडीस करून घालवून दिले' असे दामले यांनी म्हटले आहे. त्या बायकांचे 'अत्यंत गरीब महिला' असे वर्णन करून वाचकांची दिशाभूल का करावयाची? त्या भिकारणी होत्या असे का म्हणावयाचे नाही. तेथे धर्मपरिषद असल्याने अन्नछत्रही असेल या आशेने त्या भिकारणी आल्या नव्हत्या का? 'येथे अन्नछत्र नाही' असे सांगणे म्हणजे 'हिडीस फिडीस' करणे होते काय? त्या स्वयंसेवकाने त्या भिकारणीचे काय करायचे होते अशी श्री. दामले यांची अपेक्षा होती. त्यांना सरळ आतमध्ये नेऊन व्यासपीठावर बसवायला हवे होते? श्री. दामले यांच्या सभेत त्या भिकारणींचे स्वागत कसे झाले असते? माझा अगदी सरळ प्रश्न आहे आणि त्याचे उत्तरही तेवढेच सरळ आहे. सबंध विश्व हिंदू परिषदेचे कामकाज 'भंकस' होते हे दाखविण्यासाठी सहजी उपलब्ध आणि ठोकळ असा हा किस्सा लेखाच्या सुरुवातीला टाकून दिशाभूल करण्याचा प्रयत्न श्री. दामले यांनी केला आहे. प्रत्येक सभेच्या बाबतीत प्रत्येक समालोचकाला अशा प्रकारचे किस्से टाकता येणार नाहीत काय?

दुसरा किस्सा श्री. परमेकर याचे बाबतचा, श्री. परमेकर यांना 'जवळजवळ हाकलून देण्यात आले' असे श्री. दामले यांनी म्हटले आहे. सत्य परिस्थिती सांगतो, की श्री. परमेकर वार्ताहर कक्षेत माझ्या शेजारी बसले होते. श्री. परमेकर ज्या खेतवाडीत काम करतात, असे श्री. दामले म्हणतात त्या खेतवाडीत २५ वर्षे वास्तव्य केलेला मी वार्ताहर आहे. परिषदेत श्री. परमेकरांचे आणि माझे शेजारी शेजारी बसून संभाषण झाले. यापेक्षा आणखी पुरावा कोणता पाहिजे? श्री. दामले यांचा खोटेपणा सिद्ध करण्यास हा पुरावा ठीक नाही काय? का श्री. परमेकर यांचेकडून श्री. दामले यांना उत्तर हवे?

वाद घालण्याचे दोन प्रकार असतात हे श्री. दामले यांना मी सांगायला

पाहिजे का ? ते दोन मुद्दे असे असू शकतील १. विश्व हिंदू परिषदेची आवश्यकता आहे तथापि सर्व समाजाला कवेत घेण्यासाठी अमूक सुधारणा व्हायला पाहिजेत. २. विश्व हिंदू परिषदेची आवश्यकताच नाही. यापैकी श्री. दामले यांच्या लेखात परिषदेची आवश्यकताच नाही यावर काही ठिकाणी भर आहे तर काही ठिकाणी सुधारणा सुचविण्याचा आव आहे. सबंध लेखात विश्व हिंदू परिषदेला यश काय मिळाले, कोणत्या प्रतिकूल परिस्थितीत ते यश प्राप्त झाले याचा साधा उल्लेखही नाही. तात्विक चर्चा श्री. दामले यांना नको आहे, असे दिसते म्हणून किरकोळ गोष्टीवर सर्व भर देऊन, यश झाकून आणि तर्कविसंगत व उथळ युक्तिवाद करून वाचकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे म्हणून त्याच पातळीवरून त्यांचा समाचार घेणे प्राप्त झाले आहे.

स्वामी चिन्मयानंद कोणत्या गाडीतून येतात-जातात याची चिकित्सा श्री. दामले करतात. स्वामी चिन्मयानंद यांनी पायी चालत यायला हवे होते असे श्री. दामले यांना सुचवायचे आहे काय ? श्री संत तुकाराम महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्यासारखे संत पुरुष झाले, सहस्रांनो झाले तर ते नको कोणाला आहेत ? तथापि तसे जर नसेल तर धर्मावरील ज्या अधिकारी व्यक्ति आज विद्यमान आहेत त्यांचे साह्य घेऊन धर्मविषयक कार्ये पार पाडण्यात चूक कोणती ? की धर्मविषयक काहीही कार्य हिंदूंनी करावयाचेच नाही ? विचारात स्पष्टता असावी आणि ती लेखात यावी.

पायावर डोके ठेवण्याविषयी हिंदूंच्या धर्मसंमेलनात भाविकांनी धर्मगुरुंच्या पायावर डोके ठेवले तर त्यात आश्चर्य आणि अपराध वाटण्यासारखे काय आहे ? नाहीतर कोणाच्या पायावर डोके ठेवायचे ?

दुसरा महत्त्वाचा मुद्दा. या 'पाया पडण्याच्या समारंभात' व्यक्तिगत बुवाबाजी होती काय ? भोंदूगिरी होती काय ? काय होते एवढे त्यात ? उलट जे दृश्य दिसले त्यात अपूर्व आल्हाद होता, आशा होती

सर्व पंथोपपंथाचे, संप्रदायाचे, शाखांचे स्वामी व्यासपीठावर उपस्थित होते. एकमेकांशी सुसंवाद करीत होते. मांडीला मांडी लावून हिंदू समाजाच्या भवितव्याविषयी चिंता करीत होते. हिंदू समाजाच्या उत्थापनासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे याची खात्री पटली असल्याने प्रत्येकाच्या भाषणातून ओतप्रोत दिसत होते. त्याचे दुःख श्री. दामले यांना होते काय ?

परिषदेत या स्वामींनी कधीतरी व्यक्तिमाहात्म्याची वा आपल्या पीठाचे महत्तमत्त्व वर्णन करणारी भाषणबाजी केली काय ? प्रांतभेद, पंथभेद, जातीभेद विसरून, अस्पृश्यता गाडून संघटित होण्याचे आवाहन हिंदू समाजाला करण्यात आले नाही काय ? प्रत्येक स्वामींनी याच एकमेव मुद्यावर ठासून भर दिला नाही काय !

या परिषदेच्या निमित्ताने श्रोतृवृंदांत शीख, जैन, बौद्ध, शैव, वैष्णव आणि कितीतरी पंथोपपंथांचे लोक एकत्र जमलेले श्री. दामले यांना दिसले नाहीत काय? या सर्व लोकांना आणि त्यांच्या स्वामींना एकत्र आणून सबंध समाजाची चिंता वाहायला लावायचे हे यश आणि प्राप्ती साधी आहे काय? असे दृश्य नजीकच्या भूतकाळात दिसले काय? हिंदू संघटित झाले तर श्री. दामले यांना दु:ख होणार आहे काय? हिंदू संघटित झाले तर हिंदूविरोधकांना खचितच दु:ख होईल. श्री. दामले हिंदूविरोधक आहेत काय?' विचारात स्पष्टता असायला हवी असे मी म्हणतो ते यासाठी.'

कोण कोणाच्या पाया पडले याचा शोध श्री. दामले यांनी घेतला काय? एका पंथाचे लोक दुसऱ्या पंथाच्या स्वामींच्या पाया पडत नव्हते का? पंथोपपंथांत मतभेद नाहीत, सर्व स्वामी एकाच विचाराचे आहेत. एकाच अश्वत्थ वृक्षाच्या आपण म्हणजे शाखोपशाखा आहोत, या एकत्वाच्या भावनेने ऊर भरून येऊन वातावरण हलून गेले होते, ते श्री. दामले यांना कोणत्या कारणामुळे दिसले नाही? राजमाता विजयाराजे शिंदे व्यासपीठावरील उपस्थित सर्व स्वामींच्या खाली वाकून पायास स्पर्श करून पाया पडल्या हे श्री. दामले यांनी का लिहिले नाही?

महिलांचे संमेलन श्री. दामले यांना हळदीकुंकवासारखे वाटले. मग आणखी कसे वाटायला हवे होते? महिला संमेलन दुपारी २॥ वाजता झाले. रणरणते ऊन होते. मंडपात पंख्यांची सोय पुरेशी नव्हती. अशा भर उन्हात विश्व हिंदू परिषदेच्या ओढीने ज्या संसारी बायका तेथे जमा होतात त्यांच्यात 'देवयानी चौबळच्या मांड्या फाकविणारी दुनिया चविष्टपणे वाचणाऱ्या अनेकजणी असणारच' असे लिहिताना श्री. दामले यांना लाज कशी वाटली नाही? त्या बायका काय राजेश खन्नाला बघायला तेथे जमल्या होत्या की कॅबेरे पहायला आल्या होत्या? विश्व हिंदू परिषदेच्या आवाहनास साद देऊन त्या आल्या होत्या ना? श्रीमती दुर्गाबाई भागवतांसारखी सत्शील बाई या महिला संमेलनाला आली नव्हती काय? त्यांनी जे भाषण केले ते 'हौस भागविण्यासाठी' केले काय? राजमाता स्वत: उपस्थित होत्या ना? 'लिपस्टीक लावलेल्या' आणि 'पोस्टरवर शोभतील इतक्या नखरेल' बाया व्यासपीठावर होत्या, असे श्री. दामले म्हणतात. अन्य प्रांतीय बायकांचा पेहराव मराठी बायकांच्या पोषाखापेक्षा थोडा वेगळा आणि कदाचित थोडा भडक नसतो काय? म्हणून त्या असभ्य ठरतात काय? व्यासपीठावर फारच थोड्या बायका उपस्थित होत्या. त्यांची नावेही परिषदेच्या चालकांकडे मिळू शकतील. त्या बायका 'तशा' होत्या हे दामले यांना सिद्ध करता येईल काय? तेवढे धाडस ते दाखवतील काय?

पुन्हा मी सांगतो की, तात्त्विक चर्चा श्री. दामले यांना नको आहे. परिषदेच्या

यशात आणि कामकाजात त्यांना रस नव्हता म्हणून एखाद्या बाईच्या लिपस्टीककडे बघ, एखाद्या बुवाच्या जोडयाकडे लक्ष ठेव असले चाळे श्री. निळू दामले यांनी सुरू केले.

आता श्री. दामले यांची तर्कविसंगत तसेच घातुक आणि विकृत विचारसरणी पाहू.

गरिबी दूर करण्याचे मार्ग कोणते याचा विचार या परिषदेत झाला नाही आणि परिषदेच्या या संमेलनाच्या भंपक पद्धतीने गरिबांचा प्रश्न सुटणार नाही असे श्री. दामले म्हणतात.

ही परिषद गरिबी दूर करण्याचे उपाय कोणते हे ठरविण्यासाठी भरली होती काय? गरिबी दूर करण्याचे काम धर्म, संमेलने आणि विश्व हिंदू परिषदेसारख्या संस्था कधीपासून करू लागल्या? ते काम सत्तारूढ पक्षाचे, शासनाचे, अर्थशास्त्रज्ञांचेच प्रामुख्याने नाही काय? उद्या समाजवादी पक्षाच्या सभेत सौंदर्यप्रसाधनावर चर्चा झाली आणि अर्थशास्त्रज्ञांच्या सभेत बलसंवर्धनावर परिसंवाद घडले तर श्री. दामले यांना कसे वाटेल?

'तुम्ही वेदांचा कितीही उदोउदो केलात तरी आजचे मान्य आर्थिक सिद्धांत आहेत त्यानुसारच नियोजन करावे लागणार' असा उपदेश श्री. दामले यांनी केला आहे. म्हणजे श्री. दामले यांना नक्की काय म्हणायचे आहे? आजचे आर्थिक सिद्धांत ज्यांना मान्य नाहीत त्यांना वेदांचा उदोउदो करण्याचा अधिकार नाही काय? धर्म, संमेलनात वेदांचा उदोउदो होईल की आर्थिक सिद्धांताचा? परिषद कोणतीही असो, आजच्या आर्थिक सिद्धांताची चर्चा त्यात झालीच पाहिजे इतकी साचेबंद विचारसरणी दामल्यांनी कधीपासून स्वीकारली? 'तुम्ही कितीही देवांचा आणि वेदांचा उदोउदो केलात तरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत तांदळाची किंमत घसरली तर हिंदुस्थानातही तांदळाच्या किंमती घसरतील' असे ज्ञानदान श्री. दामले यांनी केले आहे. विश्व हिंदू परिषदेत आजच्या आर्थिक सिद्धांतांना आव्हान देण्यात आले होते काय? पाठिंबा वा विरोध दर्शविण्यात आला होता काय? त्यासाठी ती परिषद भरली होती काय? मग हा परस्परांचा संबंध श्री. लिमये यांनी कशासाठी जोडला आहे? आजच्या आर्थिक समस्या धर्माने सुटतील असा दावा परिषदेने केला काय? मग श्री. दामले एका गोष्टीचा संबंध दुसऱ्या गोष्टींशी लावून दिशाभूल का करीत आहेत?

आता श्री दामले यांच्या घातुक आणि विकृत दृष्टिकोणाविषयी. श्री. दामले म्हणतात, 'तळासरीला जे काम परिषद करते आहे ते चांगले मानता येईल. कोणत्याही मार्गाने का होईना पण गरीब आदिवासींचा विकास साधला जात असेल तर अमूक एक धर्मानेच का विकास केला हा मुद्दा गैरलागू ठरेल. मागासलेल्या माणसांना उत्थापन मिळते हेच महत्त्वाचे.'

बाकी फालतु गोष्टींवर श्री. दामले

यांची ठाम मते व्यक्त झालेली दिसतात. पण तळासरीच्या कामाच्या बाबतीत मात्र 'चांगले मानता येईल' एवढेच ते म्हणतात. आदिवासींचा विकास कोणत्याही धर्माने झाला तरी ते दामले यांना चालणार आहे. विश्व हिंदु परिषदेला ते चालणार नाही. या देशातील हिंदूंना ते चालणार नाही. श्री. दामले आणि त्यांचे कुटुंबीय यांचा बराच विकास व्हायचा आहे असे धरून चालू. ख्रिश्चन मिशनरी वा मुल्लामौलवी त्यांचा विकास करण्यास उत्सुक आहेत. श्री. दामले यांचा काय विचार आहे? आपल्या कुटुंबियांना ख्रिश्चन मिशनऱ्यांकडे अथवा मुल्लामौलवींकडे पाठवायला ते तयार आहेत का? कारण विकास महत्त्वाचा आहे. कोण करतो याला महत्त्व नाही.

विश्व हिंदू परिषद एकजात हिंदुमात्राला आपली मानते. आदिवासी, हरिजन आणि अन्य पीडितांनी परधर्मांत जाऊ नये म्हणून परिषद दक्ष राहू इच्छिते. परधर्मात जाण्याच्या वाटा बंद करण्यासाठी परिषदेला जे करता येणे सध्याच्या परिस्थितीत शक्य आहे ते ती करीत आहे. तळासरीला आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा काढून त्यांच्या शिक्षणाची आणि जेवणखाण्याची जबाबदारी परिषदेने उचलली आहे व ती पार पाडीत आहे. त्यामुळे तेथील ख्रिश्चन मिशनरी किती शिव्याशाप देत आहेत ते श्री. दामल्यांनी ऐकले तर परिषदेच्या कामाचे महत्त्व कळण्यास त्यांना मदत होईल.

शुद्धीकरणाच्या महान कार्याला आजीवन वाहून घेतलेल्या ब्रह्मचारी विश्वनाथजी यांची अशीच टिंगल श्री. दामले यांनी उडविली आहे. गेल्या काही वर्षात मुसलमान ५०% आणि ख्रिश्चन ३०% वाढले असे सांगून श्री. विश्वनाथजी यांनी सावधानतेचा इषारा दिला आणि शुद्धीकरण चळवळीस साह्य करण्याचे आश्वासन दिले यात काय चुकले? तसा अधिकार ब्रह्मचारीजींना नाही काय?

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या एका पुस्तकात १९०१ ची शिरगणती आधारभूत धरून असा इषारा दिला आहे की देशातील २० कोटींपैकी ५॥ कोटी हरिजन आहेत. तेव्हा हरिजनांच्या समस्यांची दखल घेतली नाही तर मुसलमान वा ख्रिश्चन धर्मात त्यांचे जाणे होईल आणि राष्ट्रीय संकट उभे होईल. सावरकर जाऊ द्यात. कारण श्री. दामले यांच्या मताप्रमाणे ते प्रतिगामी ठरतात. पण शिंदे तर प्रतिगामी नाहीत ना? त्यांनीही धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर असे म्हटले आहे; पण विश्वनाथजींनी धर्मांतराचा धोका दाखविला तर ते मात्र हास्यास्पद ठरतात हे कसे काय?

हिंदूहितासाठी जे होते ते प्रतिगामी स्वरूपाचे असते असा विचारप्रवाह या क्षेत्रात रूढ आहे. त्याला बळी पडून विकृतदृष्टीने श्री. दामले यांनी परिषदेच्या कामकाजाकडे पाहिले. म्हणून त्यांना चांगल्या गोष्टी दिसल्या नाहीत. अविछिन्न हिंदुसमाज या परिषदेच्या निमित्ताने एकत्र आला. अस्पृश्यता गाडा असा आदेश सर्व मठाधीशांनी दिला. हिंदु समाज बलवान करा, हिंदू

धर्माचे रक्षण करा असे आवाहन पंथोपंथाच्या सर्व आचार्यांनी एकत्र येऊन केले हे यश नाही काय ? ते श्री. दामले यांना दिसले नाही. त्यांचे लक्ष स्वामी चिन्मयानंदाच्या जोड्यांकडे आणि बायकांकडे होते. हा ज्याच्या त्याच्या दृष्टीचा दोष आहे यापेक्षा अधिक काय लिहावे ?

# प्रतिक्रिया : आणखी काही

'माणूस'चा २८ एप्रिलचा अंक वाचला. श्री. निळू दामले यांनी विश्व हिंदू परिषदेच्या संमेलन निमित्ताने पू. दत्ता बाळ यांच्याविरुद्ध अकारणच ओरड केली आहे. समाजवादाच्या चर्चेत जशी पारिभाषिक शब्दांची रेलचेल असते, त्यापेक्षा कितीतरी अधिक जटिलता 'अध्यात्म' क्षेत्रात आहे. श्री. दत्ता बाळ अध्यात्म क्षेत्रातील अधिकारी विद्वान असून सेनापती बापट, आचार्य अत्रे, सत्यवादीकार पाटील आदींनी त्यांच्या अलौकिक कार्याबद्दल मुक्तकंठाने प्रशंसा केलेली आहे. येथे त्यासंबंधी अधिक चर्चा न करता दामले यांनी वक्तव्य आणि कृति यातील सनातनी मंडळींच्या वर्तनातील तफावत भेदकरीतीने दाखविण्याचा जो अट्टाहास केला आहे त्यासंबंधी लिहितो. खुद्द निळू दामले व समाजवादी पक्षातील त्यांचे सहकारी व नेते यांच्या उक्ती व कृतीमधील बोचक तफावत जाणकारांना ठाऊक आहे. नांदेड व मराठवाड्यातील अनेक समाजवादी पक्षाच्या म्हणविणाऱ्या कार्यकर्त्यांत अनेक सावकार जमीनदार व शोषक आहेत. व्यासपीठावर शोषणाच्याविरुद्ध बोलायचे व प्रत्यक्ष जीवनात शोषण करून वैभव व संपन्नता भोगायची आणि जनतेच्या मनात धूळफेक करण्याचा प्रयत्न करायचा हा समाजवादी पक्षाचा कारभार दिसतो. केज मतदारसंघात बापूसाहेब काळदाते विधानसभेच्या निवडणुकीस उभे होते व निळू दामले प्रचारप्रमुख होते. पण काळदाते व्यक्तिश: चांगले असूनही बोलघेवड्या समाजवाद्यापेक्षा बाबूराव आडसकरांसारखा काँग्रेसचा अ-बोलका कार्यकर्ताच अधिक उपयोगी समजून मतदारांनी बापूसाहेबांचा दणदणीत पराभव केला. शिवाय समाजवादी म्हणविणाऱ्या कार्यकर्त्यांना काँग्रेसच्या साखरी समाजवादाच्या कुशीतच शेवटी आश्रय घ्यावा लागतो हे अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणात नुकतेच दिसले आहे. इतरत्रही अशीच परिस्थिती थोड्याफार प्रमाणात आहे. सांगायचा मुद्दा म्हणजे सनातनी लोकांप्रमाणेच समाजवादी पक्षाच्या तथाकथित पुरोगामी लोकांच्या उक्ती आणि कृतीत जमीनअस्मानाचे अंतर आहे. काचेच्या घरात रहाणाऱ्यांनी दुसऱ्याच्या घरावर दगड टाकू नयेत.

२८ एप्रिल, ७३ — देवदत्त तुंगार, नांदेड

## असल्या विवेकानंदांना खडी फोडायला पाठवले पाहिजे !

अठ्ठावीसच्या माणूसमधील निळू दामल्यांचा लेख वाचला. खरे तर अलिकडचे त्यांचे सारेच लेख विलक्षण धारदार आहेत. उपरोधाची ही धार विचारी माणसाला अस्वस्थ करणारी आहे. थोडाफार विचार, सारासार विचार करणाऱ्या व्यक्तींचेच विचार दामल्यांनी धीटपणे आणि स्पष्टपणे मांडले आहेत. अभिनंदन !

अध्यात्माच्या क्षेत्रात धुडगूस घालणाऱ्या या तथाकथित विवेकानंदांची, स्वामींची, भगवानांची सुविचारी माणसानं गंभीर दखल घेतली पाहिजे. मला तरी असे वाटते की या साऱ्यांना दुष्काळी कामावर एकदा खडी फोडायला पाठवले पाहिजे ! म्हणजे यांच्या शब्दांच्या कोलांट्या उड्या थांबतील.

२६ एप्रिल, ७३ चंद्रकांत कल्लोळी, कोल्हापूर.

[ता. क. माहिती म्हणून : इथे दत्ता बाळांचे काही ठराविक चमचे आहेत. दत्ताबाळांविषयी जरा काही कुठे विरोधी छापून आले की हे लगेच पत्रे लिहून दत्ताबाळ थोर वगैरे कसे हे सांगत सुटतात. मी खात्रीपूर्वक सांगतो आतापावेतो आपल्याकडे कोल्हापुरातून अशी दोन तीन पत्रे आली असतील. एकंदर या अध्यात्माच्या क्षेत्रातही प्रिप्लॅन्ड भंपकगिरी चाललीय. साराच खुळ्यांचा बाजार ! ]

श्री. संपादक, मुंबई, ३० एप्रिल ७३

आपल्या 'माणूस'मधील निळू दामले यांनी लिहिलेला लेख वाचला. त्या लेखावर श्री. सुभाष देसाई यांनी जी प्रतिक्रिया लिहिली आहे, ती आपण आपल्या अंकामधून प्रसिद्ध करावी. हे सहकार्य वृत्तपत्रीयनीतीनुसार अपेक्षित आहेच.

—श्री. दत्ता बाळ

## श्री. दत्ता बाळ महाराष्ट्राचे विवेकानंदच !

'Senapati Bapat called him greater than Khalil Gibran. The people regard him as a Second Vivekanand' – सेनापती बापटांनी त्यांना खलील जिब्रानपेक्षाही श्रेष्ठ म्हटले व लोक त्यांना दुसरे विवेकानंद मानतात. दि टाईम्स ऑफ इंडियाचा एक चोखंदळ स्तंभलेखक १२ जाने. ७२च्या अंकात श्री. दत्ता बाळांच्याविषयी लिहितो, दि. टाईम्स ऑफ इंडियाने जपानच्या जागतिक धर्मपरिषदेत श्री. दत्ता बाळनी जे मौलिक कार्य केले त्याचा आढावा घेताना म्हटले होते की, 'शिकॅगो जागतिक धर्मसंमेलनात विवेकानंदांनी जसा प्रभाव टाकला तसाच प्रभाव श्री. दत्ता बाळनी

जपानच्या जागतिक धर्मपरिषदेत टाकला.' जपानच्या जागतिक धर्मपरिषदेत श्री. दत्ता बाळनी भारतीय संस्कृतीविषयी जी महत्त्वपूर्ण ऐतिहासिक कामगिरी केली तिची साक्ष जपानच्या परिषदेला उपस्थित असणारे भारतीय प्रतिनिधी श्री. आर. आर. दिवाकर, साहित्य ॲकॅडमी पारितोषिक विजेते उमाशंकर जोशी, बी. आर. कुलकर्णी, दिल्ली हे आजही मोठ्या अभिमानाने देतात. जपानच्या जागतिक धर्मपरिषदेनंतर क्विलॉन येथे भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेत श्री. दत्ता बाळ यांचे पहिले व्याख्यान ऐकताच प्रभावित झालेल्या केरळवासीय जनतेने श्री. दत्ता बाळना जागतिक धर्मपरिषदेचे अध्यक्षस्थान बहाल केले व ज्या अय्यप्पा सेवा संघाच्या रौप्य महोत्सवानिमित्त ही परिषद आयोजित केली होती. त्या महोत्सवाचे उद्घाटक म्हणून श्री. दत्ता बाळ यांचीच नियुक्ती झाली. गेल्यावर्षी बिर्ला क्रीडा केंद्र मुंबई येथे इंग्लंडच्या सन् ऑरगनायझेशनने भरवलेल्या परिषदेतही श्री. दत्ता बाळनी भारतीय संस्कृतीचे दैदीप्यमान स्वरूप दाखविले. या तीन जागतिक धर्मपरिषदेतून भारतीय संस्कृतीची शान उंचावणाऱ्या श्री. दत्ता बाळांच्या कार्याची तुलना फक्त स्वामी विवेकानंदांच्या कार्याशीच करणारे टाईम्स ऑफ इंडिया, ब्लीट्झ्, गोवा मुक्ती वीर मोहन रानडे कोठे ? व्यक्तिद्वेषाच्या अंधारातले निळू दामले हे दिवाभीत कोठे ? श्री. दत्ता बाळ यांची तूलना विवेकानंदांशी केली म्हणून टाईम्स ऑफ इंडियापासून ते वीर मोहन रानडेपर्यंत साऱ्यांना 'बोगस' म्हणण्याचे धाडस निळू दामले दाखवतील काय ?

महाराष्ट्रात अनेक साधू, संत विचारवंत झाले. मात्र भगवान श्रीकृष्णांची तमाशातून होणारी बीभत्स चेष्टा थांबवण्यासाठी यशस्वी चळवळ उभारली ती फक्त श्रीदत्ताबाळ यांनीच. त्यांच्या या ऐतिहासिक कार्याचा गौरव दै. लोकसत्ताने खास अग्रलेखातूनही केला. वरील कार्याचा आढावा घेता एवढया तरुण वयात इतके समर्थ कार्य स्वामी विवेकानंदांच्यानंतर श्री. दत्ता बाळनीच केले आहे यात तिळमात्र संदेह नाही आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून श्री. दत्ता बाळांची प्रतिमा महाराष्ट्राचे विवेकानंद म्हणून पुजली जाते.

पण हे सारे निळू दामलेसारख्या अर्धवट वाचनातून निर्माण झालेल्या डॉन क्विझोटला कसे सहन होणार ? श्री. दत्ता बाळांना सारा महाराष्ट्र विवेकानंद म्हणून डोक्यावर घेऊन नाचतो हीच खरी वेदना दामलेबुवांना आहे. महाराष्ट्र श्री. दत्ता बाळ यांचा उदोउदो करतो म्हणून 'महाराष्ट्र हा दगडाधोंडयाचा देश आहे असे जे म्हणण्यात येते त्याचा अर्थ आता बरोबर समजला' असे दामलेबुवा बेंबीच्या देठापासून ओरडून सांगतात. महाराष्ट्राला दगडाधोंड्याचा देश म्हटले जाते ते भौगोलिक अर्थाने. मात्र ही भौगोलिक मोजपट्टी महाराष्ट्रीय बहुजनसमाजाला लावून महाराष्ट्रीय जनताच दगडधोंड्यासारखी निर्बुद्ध म्हणण्याचा जो विक्रमी व चक्रमी पराक्रम दामलेंनी केला आहे त्याचा जाब प्रत्येक महाराष्ट्रीयाने विचारायला

मलपृष्ठ २ वर

हवा. महाराष्ट्रीय जनतेची ही अक्षम्य बदनामी निळू दामलेंनी केली आहे. सुदैवाने दामलेबुवासारखे निर्बुद्ध दगडधोंडे महाराष्ट्रात अल्पसंख्येने आहेत.

श्री दत्ता बाळ आजच्या तरुणांना ब्रह्म, माया, मिथ्या ह्या गोष्टी सांगत नाहीत वा संन्यासमार्गही सांगत नाहीत किंवा चातुर्वर्ण्य पाळायला सांगत नाहीत तर अत्यंत तर्कशुद्धरीत्या विज्ञान व अध्यात्माचा परामर्ष घेत आहेत. त्यामुळे मानसशास्त्र, पदार्थविज्ञान, खगोलशास्त्र या शास्त्रांचाही ते परामर्ष घेतात. अलीकडेच डॉ. श्रीकृष्ण रानडे (डॉ. जयंत नारळीकर यांचे सहकारी) यांनी श्री. दत्ता बाळ यांची मुंबई आकाशवाणीवर मुलाखत घेतली. त्यावेळी त्यांनी सांगितले, की श्री दत्ता बाळ यांनी वैज्ञानिक सिद्धांत जे व्याख्यानातून व लिखाणातून वापरले ते अगदी बरोबर आहेत व श्री दत्ता बाळनी अध्यात्म व विज्ञान यांचा जो मिलाफ करण्याचा प्रयत्न केला आहे तो फार महत्त्वाचा व स्तुत्य आहे.

डॉ. रानडेंच्यासारखे थोर शास्त्रज्ञ जेथे सांगतात की, श्री. दत्ता बाळनी सांगितलेले वैज्ञानिक सिद्धांत बरोबर आहेत, तेथे हे निळू दामले अर्थशून्य व पोरकट भाष्य करतात, श्री दत्ता बाळ यांनी उच्चारलेले वैज्ञानिक सिद्धांत चुकीचे म्हणून. म्हणतात ना जेथे शहाणा जाण्याचे धाडस करीत नाही तेथे मूर्ख जाण्याचे धाडस करतो.

श्री दत्ता बाळ म्हणतात की, 'विश्व अंडाकृती आहे. प्रत्येक वस्तू विद्युत चुंबकीय लहरी प्रक्षेपित असते.' ह्या विज्ञानाशी संबंधीत श्री दत्ता बाळनी उच्चारलेल्या विधानात काय चूक आहे हे दाखवण्याचे आव्हान निळू दामले स्वीकारतील काय ?

'महाराष्ट्रातले २-४ लाख सायन्सचे विद्यार्थी दररोजच विज्ञानाशी अध्यात्माची सांगड घालीत आहेत' असा अजब जावईशोध दामलेबुवा जेव्हा लावतात तेव्हाच दामलेंचे विज्ञान वा अध्यात्मक्षेत्रातील अचाट ज्ञान दिसते. सायन्सचे विद्यार्थी दररोज विज्ञानाशी अध्यात्माची सांगड घालीत आहेत याचा अर्थ काय ? असली भोंगळ व अर्थशून्य विधाने करणाऱ्या दामलेंनी जे आपले क्षेत्र नाही त्यात अकारण लुडबूड कशाला करावी ? हा शुद्ध पोरकटपणा आणि आचरटपणाही आहे.

श्री. दत्ता बाळ जे बोलले नाहीत ते त्यांच्यावर लादण्याचा क्षुद्रपणा निळू दामलेंनी केलेला आहे. 'घनतम आत्मा' हा शब्द श्री दत्ता बाळनी आपल्या व्याख्यानातून वा कोणत्याही लिखाणातून वापरलेला नाही. 'देवदेवतांची विटंबना थांबवा. चुटकीसारखे सर्व प्रश्न सुटतील जादूच्या कांडीप्रमाणे' असे शिवाजी पार्कवरच्या व्याख्यानात श्री दत्ता बाळनी केव्हाही म्हटले नाही याची साक्ष श्रोते, पत्रकारही देतील. याचा स्पष्ट अर्थ असा की, निळू दामले ह्या क्षुद्र मनोवृत्तीच्या माणसाने जाणीवपूर्वक पूर्वग्रह दूषित झाल्याने श्री दत्ता बाळ यांच्याविषयी अवास्तव लिहिले आहे.

श्री दत्ता बाळ यांचे कार्य व विचार विवेकानंदांच्याप्रमाणे आहे की नाही, हे ठरविण्यास समाज समर्थ आहे. त्याला निळू दामलेसारखा ढोंगाची कावीळ झालेला हवा कशाला ?

—सुभाष के. देसाई

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर